






# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ११.०८.२०२६ | अंक नं. ११३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# बेशिस्त वाहनचालकांमुळे शहराचा झाला कोंडवाडा; बाजारपेठांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या गंभीर



शहरातील डाळ मंडईच्या कोपऱ्यावर झालेली वाहतूक कोंडी. (छाया : धनेश कटारिया)

नगर - शहरातील अरुंद रस्ते आणि या रस्त्यांवर आडव्या-तिडव्या लावलेल्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीच्या समस्येने गंभीर रुप धारण केले आहे. पादचाऱ्यांना पायी चालणेही अवघड झाले असून, समोरुन येणाऱ्या वाहनाला देखील जाण्यासाठी जागा करुन दिली जात नाही. त्यामुळे व्यापारी, ग्राहक यांना मोठा मनस्ताप करावा लागत आहे. वाहतूक शाखा निव्वळ नावालाच उरली की काय, असा सवाल संतप्त नागरिक आणि व्यापारी उपस्थित करीत आहेत.

शहरात अवजड वाहनांना दिवसा प्रवेश करण्यास मनाई आहे. मात्र, छोटी वाहने, टेम्पो सर्रास शहरात येतात. मात्र, ही वाहने व्यवस्थित पार्किंग केली जात नाहीत. रस्त्यावरच आडवे-तिडवे वाहन उभे करुन माल उतरविणे किंवा भरण्याचे काम केले जाते. समोरुन आलेल्या वाहनांनाही जाण्यासाठी जागाही दिली जात नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. या वाहतूक कोंडीमुळे पर्यायी रस्त्यांवरही वाहनांची गर्दी होते. त्यामुळे एक रस्ता जॅम झाला की दुसऱ्या रस्त्यांवर वाहतूक वाढून तिकडेही कोंडीसदृश्य परिस्थिती निर्माण होते. असे चित्र शहरात रोज दिसत असतानाही वाहतूक शाखा कारवाई करण्याचे धाडस दाखवित नाही. त्यामुळे वाहतूक शाखेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. शहरातील अनेक महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या भागांमध्ये वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. चितळे रोड, नवी पेठ, दिल्ली गेट, सर्जेपुरा, टेली खुंट, डाळ मंडई, गंज बाजार, सराफ बाजार, कोठला, माळीवाडा अशा वर्दळीच्या भागात एक मोठे वाहन आले की इतर सर्व वाहने अडकून पडतात आणि वाहतूक कोंडी होते. कसेबसे या वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्याची वेळ नागरिकांवर येते.

काही वाहनचालक रस्त्यांवर वाहन लावून गायब होतात. याशिवाय अनेक रस्त्यावर दोन्ही बाजूंनी अनधिकृत अतिक्रमणे वाढली आहेत. यामुळे रस्ते अत्यंत संकुचित झाले आहेत. परिणामी, या रस्त्यांवर दररोज आणि सर्रास वाहतूक कोंडी पाहायला मिळते. वाहनचालकांकडून रस्त्यावरच वाहने सर्रास उभी केली जातात, ज्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होतो. गेल्या अनेक वर्षांपासून नगरकरांना या नित्यनेमाच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

## वाहतूक पोलीस दाखवा...

शहरातील नेहमी वर्दळीच्या ठिकाणी कधीही वाहतूक पोलीस नसतात. त्यामुळे बेशिस्त वाहन चालकांना मोकळे रान सापडते आणि कधीही, कोठेही कशीही वाहने उभी केली जातात. रस्त्यातील वाहन बाजुला घेण्यास सांगितले तर अरेरावी केली जाते. त्यामुळे या वाहन चालकांनाही कोणी काही बोलण्यास धजावत नाही. वाहतूक पोलिसांकडे तक्रार करायची असेल तर पोलीसही वेळेवर उपलब्ध नसतात. आता शहरात वाहतूक पोलीस दाखवा आणि बक्षीस मिळवा, अशी योजना चालू करावी, अशी मागणी संतप्त नगरकर करीत आहेत.

## गस्तीची मागणी

बेशिस्त वाहनचालक आणि बेकायदेशीर पार्किंग करणाऱ्यांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करावी, शहरात वाहतूक पोलिसांचे विशेष पथक नेमून नियमितपणे गस्त घालण्यात यावी, पार्किंगचे नियम तयार करावेत, अशा मागण्याही नागरिकांकडून केल्या जात आहेत.



जुन्या महापालिका कार्यालयात जन्म-मृत्यू दाखल्यांसाठी लागलेली रांग.

# मनपाच्या भोंगळ कारभारामुळे जन्म-मृत्यू दाखल्यासाठी हेलपाट्यांवर हेलपाटे मारण्याची नागरिकांवर नामुश्की

नगर - नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले वेळेत मिळावेत, यासाठी महापालिकेच्या जुन्या इमारतीसह प्रभाग समिती कार्यालयांमध्ये दाखले निर्गमनासाठी कालमर्यादा ठरवून देण्यात आली आहे. मात्र, तरीही महापालिकेच्या भोंगळ कारभारामुळे नागरिकांना वारंवार महापालिकेच्या कार्यालयांमध्ये जन्म-मृत्यूच्या दाखल्यांसाठी हेलपाटे मारावे लागत आहेत. मनपाच्या या गैरकारभारास नागरिक अक्षरशः कंटाळले असून, त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांसोबत वादांचे प्रसंगही घडत आहेत.

विविध कामांसाठी नागरिकांना जन्म-मृत्यूचे दाखले गरजेचे असतात. मात्र, हे दाखले देणारे कर्मचारी कधीही नागरिकांना योग्य माहिती सांगत नाहीत. तसेच व्यवस्थित संवादही साधत नाहीत. इकडे जा-तिकडे जा असे फिरवून झाल्यानंतर पुन्हा तोच कर्मचारी संबंधित नागरिकांचा अर्ज घेवून त्याला पुढील तारीख देतो. मात्र, तारीख उलटली तरीही वेळेत जन्म-मृत्यूचे दाखले दिले जात नाहीत. अनेकदा संबंधित कॉम्प्युटर ऑपरेटरच्या चुकीमुळे नाव नोंदविताना चुकीचे नाव लागते, अशा प्रकारातही संबंधित कर्मचारीही काहीही ऐकून घेत नाहीत. उलट त्या नागरिकांना सुनावले जाते. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढत आहे.

दाखले देण्यासाठी प्रशासनाने जरी कालमर्यादा घालून दिलेली असली तरी ती पाळली जात नाही, नागरिकांना व्यवस्थित माहिती सांगितली जात नाही. त्यामुळे दाखले मिळविण्यासाठी नागरिकांना अक्षरशः तासन्तास रांगेत ताटकळत उभे राहावे लागते. तासभर उभे राहिल्यानंतर त्यांना पुढील तारखेला बोलावले जाते. त्यामुळे एका दाखल्यासाठी निर्धारीत मुदत संपली तरी नागरिकांना हेलपाट्यांवर हेलपाटे मारण्याची नामुस्की ओढवत आहे. वेळेवर कागदपत्रे मिळत नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र संताप उसळला आहे.

जन्मानंतर बालकाची कागदपत्रे आणि मृत्यूनंतर नातेवाईकांसाठी मृत्यूचा दाखला हा अत्यंत संवेदनशील आणि कायदेशीर व शासकीय कामांसाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. मात्र, याच कागदपत्रांसाठी नागरिकांची मनपा कर्मचाऱ्यांकडून अवहेलना केली जाते. अनेक ठिकाणी शासकीय योजना, शाळा प्रवेश किंवा इतर कायदेशीर कामांसाठी जन्म-मृत्यू दाखल्यांची अत्यंत आवश्यकता असते. मात्र, दाखले वेळेत न मिळाल्यामुळे नागरिकांची कामे खोळंबून पडतात. अनेकांना त्यापोटी नुकसानही सहन करावे लागते. या प्रशासकीय दिरंगाईचा फटका सर्वसामान्यांना बसत आहे.

जुन्या महापालिकेत जन्म-मृत्यू नोंदणी विभागातील कर्मचाऱ्यांच्या गलथान कारभारामुळे रांगाच्या रांगा लागाव्या लागत आहेत. कार्यालयात वारंवार चकरा मारूनही कामे होत नसल्याने नागरिकांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात आहे. जुन्या महापालिकेतून दाखला मिळत असतानाही कर्मचारी सावेडी प्रभाग कार्यालयाचा रस्ता नागरिकांना दाखवितात. त्यामुळेही नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. या गंभीर बाबीकडे महापालिका आयुक्तांनी लक्ष घालून दाखले देण्याची प्रक्रिया सुटसुटीत व पारदर्शक करावी, अशी आक्रमक मागणी होत आहे.










जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेंद्र गायकवाड



नगर - राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटन या सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी राजेंद्र महादू गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. एम. एल. शर्मा यांच्या आदेशाने नियुक्तीचे अधिकृत अधिघोषण-पत्र जारी करण्यात आले.

राजेंद्र गायकवाड हे अहिल्यानगर येथील रहिवासी असून, सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत. मानवाधिकारांचे संरक्षण, सामाजिक न्याय, वंचित व दुर्बल घटकांच्या हक्कांसाठी काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत संघटनेने महाराष्ट्र प्रदेश सचिवपदाची जबाबदारी दीली आहे. राष्ट्रीय मानवाधिकार सेवा संघटन ही कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नसलेली सामाजिक संघटना आहे. जात, भाषा आणि प्रदेश- सबसे बढ़कर भारत देश हा संघटनेचा संदेश असून, समाजातील सर्व घटकांना समान न्याय व मानवाधिकार मिळवून देण्यासाठी कार्य करण्याचा संघटनेचा प्रयत्न आहे. राजेंद्र गायकवाड यांच्या नियुक्तीमुळे अहिल्यानगरसह महाराष्ट्रात संघटनेच्या सामाजिक व मानवाधिकारविषयक कार्याला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



डीएसपी चौक येथे मोर्चात कार्यकर्त्यांना संबोधित करताना आ. संग्राम जगताप.

# धीरज परदेशी यांच्या मृतदेहासह डीएसपी चौकात हजारो हिंदूंचा आक्रोश

## पोलिसांनी जीहाद्यांचा बंदोबस्त केला नाहीतर आम्ही त्यांचा बंदोबस्त करू : आ.संग्राम जगताप

नगर - महानगरपालिकेचा कर्मचारी धीरज परदेशी याने केवळ कपाळी भगवा टिळा लावून कब्रस्तानात कर्तव्य बजावण्यास गेल्याने या जीहाद्यांनी त्यांची क्रूरपणे हत्या केली. ही हत्या जुन्या वादातून झाली नसून पूर्व नियोजित होती. आता या जीहाद्यांचे हिंदुंवर होणारे हल्ले आम्ही सहन करणार नाही. जर पोलिसांनी या जीहाद्यांचा बंदोबस्त केला नाहीतर हा संग्राम त्यांच्या भागात घुसून त्यांचा बंदोबस्त करेल. शहरात त्यांना फिरू देणार नाही, असा संताप आ.संग्राम जगताप यांनी व्यक्त करून धीरज परदेशी यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांची भूमिका दिशाभूल करणारी आहे. पोलिसांनी केवळ चिल्लर आरोपी पकडले असून धीरजला प्रत्यक्ष मारणारे प्रमुख जिहादी आरोपी अद्याप मोकाटच आहेत. त्यांना तातडीने पकडून हा खटला फास्टट्रॅकवर चालवून सर्व आरोपींना लवकरात लवकर फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, आरोपींच्या अनधिकृत घरांवर तातडीने बुलडोझर चाललाच पाहिजे, अशीही मागणी आमदार जगताप यांनी केली.

महापालिकेचा कंत्राटी कर्मचारी धीरज परदेशी याच्या हत्येच्या निषेधार्थ नगर शहरासह संपूर्ण जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. सोमवारी सायंकाळी आमदार जगताप यांच्या नेतृत्वाखाली नगर-संभाजीनगर महामार्गावरील डीएसपी चौकात हजारो हिंदूंनी ठिय्या आंदोलन करत आक्रोश व्यक्त केला. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर, आमदार अक्षय कर्डिले, संग्राम भंडारे महाराज, मृत धीरज परदेशीची पत्नी व कुटुंबीय यांच्यासह विविध हिंदुत्ववादी संघटनांचे हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. जोपर्यंत प्रमुख आरोपींना अटक होत नाही तोपर्यंत आम्ही धीरजचा अंत्यविधी करणार नाही, अशी आक्रमक भूमिका आंदोलकांनी यावेळी घेतली. यावेळी आक्रमक झालेल्या आंदोलकांनी जय श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयजयकाराच्या घोषणांनी परिसर दणाणून टाकला. वरिष्ठ पोलीस अधिकारी व प्रांताधिकारी यांनी आंदोलकांशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला.

आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले, धीरज परदेशी यांच्या दुर्दैवी मृत्यूची घटना अत्यंत वेदनादायी आणि संतापजनक आहे. जीहाद्यांच्या या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध करीत, या प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह सर्व दोषींना तात्काळ अटक करून कठोरात कठोर शिक्षा झालीच पाहिजे, या प्रकरणी एसआयटी स्थापन करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहोत. शहरातील कोठला परिसरातील व मुकुंदनगर भागातील जीहाद्यांचे अतिक्रमणे त्वरित काढून त्यांच्यावर बुलडोझर फिरवा, अशी मागणी करत आ.संग्राम जगताप यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेला सहमती त्यांनी दिली.

संग्राम भंडारे महाराज म्हणाले, रुग्णवाहिकेतील धीरजचा मृतदेह पाहिल्यावर सर्वांनी थोडे अंतर्मुख होऊन विचार करावा. अशी वेळ दुसऱ्या कोणावरही येऊ नये यासाठी त्याचे कुटुंबीय हुंदका आवरून आंदोलन करत आहेत. यासाठी आता सर्व हिंदुनी जागरूक होऊन जशास तसे उत्तर या जिहाद्यांना देणे आवश्यक आहे. धीरजचा दशक्रिया विधी झाल्यावर आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली सर्व हिंदूंनी मुकुंदनगरमध्ये भगवे झेंडे घेऊन घुसून त्यांची दहशद मोडून काढवी, असे आवाहन केले.

आ. अक्षय कर्डिले म्हणाले, निष्पाप धीरजची हत्या करणाऱ्या आरोपींना तातडीने अटक झालीच पाहिजे. आरोपी अटक होत नसतील तर आम्हाला सांगा, आम्ही धरून आणू व त्यांचे मुंडके छाटू, असे म्हणत आता सकल हिंदू एक होत असल्याने या जीहाद्यांच्या मतांची आम्हाला गरज नाहीये, असा संताप व्यक्त करून स्व.धीरजच्या कुटुंबियांच्या मागे मी खंबीरपणे उभा राहणर असल्याची ग्वाही दिली.

# पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालण्याचा रिक्षा संघटनेचा इशारा

नगर - नगर शहरात परवाना नसलेल्या व स्क्रॅप केलेल्या शेकडो रिक्षा राजरोसपणे धावत आहेत. केवळ ३ प्रवाश्यांचा परवना असलेल्या रिक्षांमधून सर्रास जादा १० ते १२ प्रवाश्यांची बेकायदेशीर वाहतूक होत आहे. वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने राजरोजपणे हे होत आहे. यासाठी वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी रिक्षाचालकांकडून १२०० रूपये महिन्याप्रमाणे हप्ते गोळा करून प्रवाशांच्या जिवाशी खेळत आहेत. त्यामुळे परवाना नसलेल्या रिक्षा तातडीने जप्त करून कायमस्वरूपी बंद कराव्यात, तसेच हप्ते खोर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवरही कडक कारवाई करून राज्य गुन्हा अन्वेशन विभागाकडून या हप्तेखोरीचा तपास करावा. अन्यथा १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालू, या इशाऱ्याचे निवेदन अहिल्यानगर जिल्हा रिक्षा चालक मालक संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना दिले.

निवेदनात नमूद केले आहे, नगर शहरात ५५०० रिक्षांची अधिकृत नोंद आहे. मात्र शहरात या रिक्षा व्यतिरिक्त आरटीओकडे नोंद नसलेल्या व स्क्रॅप केलेल्या हजारो रिक्षा राजरोसपणे प्रवासी वाहतूक करत आहेत. तसेच बेकायदेशीरपणे रिक्षांमध्ये १० ते १२ प्रवासी कोंबून बसवले जात असून प्रवाश्यांच्या जीवाचा खेळ केला जात आहे. हे सर्व बेकायदेशीर कामे वाहतूक शाखेच्या व प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या आशीर्वादाने होत असून वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी रिक्षाचालकांकडून १२०० रूपये प्रती महिना हप्ता घेत आहेत.

प्रवाश्यांच्या जीवाचा खेळ हे अधिकारी व विना परवाना रिक्षाचालक करत आहेत. हा प्रकार तातडीने थांबवा व परवाना नसलेल्या रिक्षा तातडीने जप्त करून कायमस्वरूपी बंद करा. तसेच हप्ते खोर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावरही कडक कायदेशीर कारवाई करून राज्य गुन्हा अन्वेशन विभागाकडून या हप्तेखोरीचा तपास करावा. अन्यथा दि. १५ ऑगस्ट रोजी आहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालू, असा इशारा देण्यात आला आहे.

निवेदनावर अहिल्यानगर जिल्हा रिक्षा चालक मालक संघटनेचे उपाध्यक्ष नासीर खान, दत्ता वामन, सुधाकर साळवे, अशोक औशिकार, लतीफ शेख, गणेश आटोळे आदींच्या सह्या आहेत.



हप्तेखोर पोलिसांवर कडक कारवाई करून परवाना नसलेल्या व स्क्रॅप केलेल्या रिक्षा कायमच्या बंद करा अन्यथा पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवून घेराव घालू, या इशाऱ्याचे निवेदन अहिल्यानगर जिल्हा रिक्षा चालक मालक संघटनेचे कार्याध्यक्ष विलास कराळे यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना दिले.

# ओशो मान्सून फेस्टिव्हलमध्ये रंगणार सुफी दरबार; आंतरराष्ट्रीय गायक पवन नाईक यांची सुरेल मैफिल

नगर - पुण्यातील सुप्रसिद्ध ओशो इंटरनॅशनल मेडिटेशन रिसॉर्ट येथे ११ ते १५ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या ओशो मेडिटेशन अँड म्युझिक मान्सून फेस्टिव्हलमध्ये संगीतप्रेमींसाठी एक विशेष पर्वणी ठरणारा सुफी दरबार हा कार्यक्रम रंगणार आहे. आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शास्त्रीय आणि सुफी गायक पवन श्रीकांत नाईक यांच्या सादरीकरणामुळे या महोत्सवाला विशेष आकर्षण प्राप्त झाले आहे.

११ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० ते ११.३० या वेळेत होणाऱ्या या विशेष मैफिलीत सुफी, भक्ती, शास्त्रीय आणि आध्यात्मिक संगीताचा अनोखा संगम अनुभवता येणार आहे. ध्यान, शांतता आणि संगीत यांचा मिलाफ घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमाची संगीतप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

पवन नाईक हे भारतीय शास्त्रीय संगीतासह सुफी गायनाच्या क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय स्तरावर परिचित नाव असून, त्यांनी भारतासह विविध देशांमध्ये आपल्या सुरांची मोहिनी घातली आहे. त्यांच्या सादरीकरणामध्ये अध्यात्म, प्रेम, मानवी मूल्ये आणि सूफी संतांचा संदेश प्रभावीपणे व्यक्त होत असतो. या मैफिलीत पवन नाईक यांच्यासमवेत अनेक नामवंत सहकलाकार सहभागी होणार आहेत. कुलदीप चव्हाण, सुरज शिंदे, श्रेयस शित्रे, पवन तळेकर, नवरत्न वर्मा, निनाद पारखी, जयंत पाठक, पंकज शर्मा, सरोज पलाडिया, कल्याण मुरकुटे, पंकज नाईक, अथर्व कोरडे, मुलांशु परदेशी आणि संकेत गांधी हे कलाकार विविध वाद्यसंगती आणि स्वरांच्या माध्यमातून कार्यक्रमाला बहार आणतील.

तबला, हार्मोनियम, काहोन, बेंजो आणि इतर वाद्यांच्या सुरेल साथीत सादर होणारा सुफी दरबार हा कार्यक्रम केवळ संगीत मैफल न राहता एक आध्यात्मिक अनुभव ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. सुफी संगीताच्या माधुर्यातून ध्यान आणि अंतर्मुखतेचा अनुभव देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून केला जाणार आहे.

ओशो मान्सून फेस्टिव्हलमध्ये देश-विदेशातील ध्यानसाधक, संगीतप्रेमी आणि पर्यटक सहभागी होत असतात. संगीत आणि ध्यान यांचा समन्वय साधणाऱ्या या महोत्सवामध्ये ङ्गसुफी दरबारङ्ग हा कार्यक्रम विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. संगीत, अध्यात्म आणि शांततेचा अद्वितीय अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या रसिकांसाठी हा कार्यक्रम एक अविस्मरणीय पर्वणी ठरणार असून, पुण्यातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वातावरणाला या मैफिलीमुळे एक नवी उंची प्राप्त होणार आहे. मैफिलीसाठी गुरुवर्य सुरेश साळवी, कुमुदिनी बोपर्डीकर, मधुसुदन बोपर्डीकर, रेवणनाथ भनगडे, रघुनाथ केसकर, वीणा कुलकर्णी, विकास कशाळकर, शुभांगी बहुलीकर, शुभलक्ष्मी गुणे, शुभांगी मांडे, सतीश आचार्य व सुफी फैय्याज अहमद यांनी विशेष परिश्रम घेतले.

## राजाराम पांढरकर यांचे दुःखद निधन



नगर - येथील राजाराम ज्ञानोबा पांढरकर यांचे १० ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ११ ऑगस्ट रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, २ मुले, १ मुलगी असा परिवार आहे.


## लक्ष्मीबाई राऊत यांचे दुःखद निधन



नगर - नवनाथनगर, बोल्हेगाव येथील रहिवासी लक्ष्मीबाई महादेव राऊत (वय ५८) यांचे ११ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, २ मुले, सुना, नातवडे असा परिवार आहे.

## शंकर कांबळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - आठवड (ता.नगर) येथील शंकर माधव कांबळे (वय ६८) यांचे ३ ऑगस्ट रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर राहत्या घरी शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुले, सुना, १ मुलगी, नातवंडे, जावई असा परिवार आहे. जालिंदर, सुरेश, विशाल कांबळे, गायत्री साळवे यांचे ते वडील होत. व्हीआरडीईचे ते सेवानिवृत्त कर्मचारी होत.

# पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना जाहीर!

## शिंदे, इनामदार, राजन, सुपेकर, जोरी, डॉ. गोर्डे यांनाही विविध पुरस्कारांची घोषणा

नगर - सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या १२६ व्या जयंती दिनाच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव आणि प्रबोधन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदाच्या वर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे साहित्य जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना, राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार सचिन शिंदे यांना आणि राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार मालती इनामदार यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या जयंती दिनी साहित्य, कला, नाट्य आणि प्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम प्रवरा परिवाराने सुरू केलेला आहे. यंदाचे पुरस्काराचे हे ३६ वे वर्ष आहे. पद्मश्रींच्या जयंती दिनी २७ ऑगस्ट रोजी नारळी पौर्णिमेला प्रवरानगर येथे राज्य आणि जिल्हास्तरीय पुरस्कारांचे वितरण ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के-पाटील, कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे-पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या निवड समितीत अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्यासह डॉ. एकनाथ पगार, डॉ. दिलीप धोंगडे आणि प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर यांनी काम पाहिले.

यावर्षी ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना साहित्य जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, १ लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पत्रकार ते साहित्यिक असा यशस्वी प्रवास करताना समाजातील शोषित, वंचित घटकांचे दुःख समजून घेत आणि पत्रकारितेत फील्डवर काम करताना आलेले अनुभव साहित्याच्या माध्यमातून वाचकांसमोर आणण्याच्या त्यांच्या यशस्वी प्रयत्नांचा सन्मान म्हणून त्यांच्या नावाची निवड करण्यात आली असल्याचे सांगण्यात आले.



समितीच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार (रुपये ५१ हजार आणि स्मृतिचिन्ह) पुणे येथील संहिता राजन यांच्या चल गं सखे वारुळाला या कथासंग्रहास दिला जाणार आहे. त्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असलेल्या आघाडीच्या तरुण लेखिका असून, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्री संगणक अभियंत्यांच्या अस्तित्वाभोवती निर्माण झालेल्या नव्या नेपथ्याची मांडणी त्यांच्या लिखाणातून करुन त्याचे भेसूर चित्र त्यांनी कथानकाच्या माध्यमातून पुढे आणले आहे.

मानवी व्यवहाराचे, जीवन व्यवहाराचे, नातेसंबंधांचे, कौटुंबिक संरचनेचे आणि भवतालच्या समाज व्यवहाराचे सूक्ष्म व अंतर्गत अनुभव शब्दबद्ध करणाऱ्या सुरेंद्र सुपेकर यांच्या समर ऑफ सेव्हेंटी नाईन या कादंबरीस राज्यस्तरीय विशेष साहित्य पुरस्कार (रुपये २५ हजार आणि स्मृतिचिन्ह) देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

नाट्य प्रयोगांपासून ते प्रायोगिक नाटकांसाठी काम करतानाच नाट्यचौफुला अंतर्गत सलग चार नाट्य प्रयोगांचे महाराष्ट्रभर प्रयोग आणि एकूण ३५ नाटके व ५० हून अधिक एकांकिकांचे दिग्दर्शन करणारे सचिन शिंदे यांना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे-पाटील राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार यंदाच्या वर्षी जाहीर झाला आहे. आपल्या मातोश्री विठाबाई नारायणगावकर यांच्याकडून नृत्य व संगीताचे धडे घेऊन तमाशा कलेला पुढे घेऊन जाणाऱ्या मालती इनामदार यांना राज्यस्तरीय कलागौरव तमाशा कलावंत पुरस्कार (रुपये २५ हजार आणि स्मृतिचिन्ह) देऊन गौरविले जाणार आहे.

मराठी भाषेच्या हितासाठी व समृद्धीच्या अनुषंगाने पूरक ठरणारे कार्यशाळा, व्याख्याने, परिसंवाद असे उपक्रम आयोजित करून, मराठी भाषेसाठी समर्पित भावनेने काम करणारी संस्था म्हणून मराठी साहित्य परिषदेची ओळख आहे. या संस्थेस यावर्षी राज्यस्तरीय प्रबोधन पुरस्कार देण्याचा निर्णय निवड समितीने घेतला असून, याही पुरस्काराचे स्वरूप रुपये २५ हजार आणि स्मृतिचिन्ह असे आहे.

सामान्य घरातील खेड्यातून आलेल्या तरुणाला नोकरी मिळाल्या नंतरही घर, कुटुंब, गाव, नातेसंबंध यांना सांभाळताना जो अनुभव येतो, त्यातून मनाची जी घालमेल होते, त्याचे जिवंत चित्रण खटपट या आत्मचरित्रातून शब्दबद्ध करणारे निवृत्ती जोरी यांना यंदाचा अहिल्यानगर जिल्हास्तरीय साहित्य पुरस्कार (रुपये १० हजार आणि स्मृतिचिन्ह) जाहीर झाला आहे. तसेच, एक संवेदनशील व्यक्ती म्हणून आपल्या भवताली वावरणाऱ्या माणसांमधून आणि त्यांच्याशी येणाऱ्या संबंधातून शांतीचा शोध आणि बोध होऊ शकतो, याचा अनुभव देणाऱ्या शांतीच्या शोधात या पुस्तकास उत्तेजनार्थ साहित्य पुरस्कार (रुपये ५ हजार आणि स्मृतिचिन्ह) देऊन प्रोत्साहित केले गेले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### गोडवा साखरेचा, धोका आरोग्याचा!

आजकालच्या धावपळीच्या जीवनशैलीत साखरेचे अतिरिक्त सेवन हे मधुमेह, लठ्ठपणा, हृदयाचे आजार, यकृतावर चरबी जमणे आणि दातांच्या समस्यांचे मुख्य कारण बनले आहे. एका निरोगी व्यक्तीने दिवसभरात ५ ते ६ चमच्यांपेक्षा (सुमारे २५ ग्रॅम) जास्त साखरेचे सेवन करू नये. साखरेचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी केवळ चहा किंवा कॉफीमधील साखर कमी करणे पुरेसे नसते, तर वेष्टनबंद रस, थंड पेये, बिस्किटे, चटण्या आणि भट्टीतील पदार्थांमध्ये असलेली 'लपलेली साखर' टाळणे अत्यंत गरजेचे आहे. शुद्ध पांढऱ्या साखरेऐवजी मर्यादित प्रमाणात गूळ, मध किंवा खजुरासारखे नैसर्गिक पर्याय वापरावेत आणि मैद्याच्या पदार्थांऐवजी ज्वारी, बाजरी, नाचणी व ओट्स यांसारख्या तंतुमय धान्यांचा आहारात समावेश करावा. जेवणात पालेभाज्या, कच्च्या भाज्यांची कोशिंबीर आणि प्रथिनांचे प्रमाण जास्त ठेवल्याने शरीरातील अन्नाचे पचन हळूहळू होते आणि रक्तातील साखर एकदम न वाढता नियंत्रित राहते. जेवणानंतर शतपावली करावी.

## पाककला

### खेकडा कांदा भजी

**साहित्य :** मध्यम आकाराचे उभे पातळ चिरलेले कांदे ३, बेसन (डाळीचे पीठ) १ वाटी, तांदळाचे पीठ २ चमचे, लाल तिखट १ चमचा, बारीक चिरलेली हिरवी मिरची १, ओवा १/२ चमचा, हळद १/४ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे, चिमूटभर खाण्याचा सोडा (ऐच्छिक), चवीनुसार मीठ, तळण्यासाठी तेल.

**कृती :** सर्वप्रथम एका मोठ्या भांड्यात उभा पातळ चिरलेला कांदा घ्या. त्यात मीठ आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घालून कांदा हाताने चांगला चोळून मोकळा करा. कांद्याला आपोआप पाणी सुटेल, त्यामुळे वेगळे पाणी घालण्याची अजिबात गरज नाही. आता त्यात लाल तिखट, हिरवी मिरची, हळद आणि हातावर चोळून ओवा टाका. सर्व जिन्नस व्यवस्थित एकत्र करून घ्या. यानंतर त्यात तांदळाचे पीठ आणि थोडे थोडे करून बेसन टाका. कांद्याला सुटलेल्या पाण्यातच बेसन पीठ व्यवस्थित कालवून घ्या. पीठ जास्त पातळ न करता कांद्याला फक्त कोटिंग येईल असे घट्टसर मळून घ्या. कढईत तेल चांगले कडकडीत गरम करून घ्या. गॅस मध्यम आचेवर ठेवा. तयार मिश्रणातून थोडे थोडे पीठ बोटांनी पसरवत (खेकड्याच्या पायांसारखे सुटे सुटे) गरम तेलात सोडा. भजी दोन्ही बाजूंनी छान कुरकुरीत आणि सोनेरी रंग येईपर्यंत तळून घ्या. तयार झालेली गरमागरम खेकडा कांदा भजी हिरवी चटणी किंवा तळलेल्या हिरव्या मिरचीसोबत सर्व्ह करा.

## वास्तू

### वर्क फ्रॉम होमसाठी

* काम करताना तुमचे तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेकडे असावे. यामुळे एकाग्रता वाढते आणि निर्णयांमध्ये स्पष्टता येते.

* तुम्ही बसत असलेल्या खुर्चीच्या मागे उघडी खिडकी किंवा उघडा दरवाजा असण्याऐवजी भक्कम भिंत असावी. हे स्थैर्याचे प्रतीक मानले जाते. लाकडी मेज वापरणे अधिक सकारात्मक मानले जाते.

## सौंदर्य

२ चमचे मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजत ठेवा. सकाळी त्याची बारीक पेस्ट करून केसांच्या मुळांना लावा. ३० मिनिटांनी धुवून टाका. यामुळे कोंडा दूर होतो.

## सल्ला

पुरण, रस्सा/ग्रेव्ही पातळ झाली असल्यास थोडे भाजलेले बेसन किंवा उकडलेला बटाटा मॅश करून टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२६

**दर्श अमावास्या, दीपपूजन, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, पुष्य ०८।००, आश्लेषा ३०।०७, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०६ वा. १२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** कामाचा वेग वाढेल. नवीन संधी समोर येतील. दिवस उत्साहात जाईल.

**वृषभ :** कौटुंबिक बाबींवर भर द्याल. आर्थिक नियोजन आवश्यक आहे. मन प्रसन्न राहील.

**मिथुन :** संवाद कौशल्यामुळे कामे मार्गी लागतील. मित्रांचे सहकार्य लाभेल. प्रवासाचा योग आहे.

**कर्क :** सकारात्मक विचारांनी कामे पूर्ण करा. धनलाभाची शक्यता आहे. आरोग्याची काळजी घ्या.

**सिंह :** आत्मविश्वासात वाढ होईल. महत्वाचे निर्णय सहज घेता येतील. कामात यश मिळेल.

**कन्या :** संयम ठेवून निर्णय घ्या. अचानक खर्च वाढू शकतात. मागील उधारी वसुल होईल.

**तुळ :** नवीन ओळखी फायदेशीर ठरतील. अडकलेली कामे पूर्ण होतील.

**वृश्चिक :** कार्यक्षेत्रात कौतुक होईल. जबाबदाऱ्या वाढण्याची शक्यता आहे. दिवस यशदायी ठरेल.

**धनु :** नशिबाची साथ लाभेल. धार्मिक कार्यात सहभाग वाढेल. नवीन योजना आखाल.

**मकर :** कामात गुप्तता बाळगा. धावपळ वाढण्याची शक्यता आहे. शांत राहून कामे करा.

**कुंभ :** भागीदारीत फायदा होईल. जोडीदाराची उत्तम साथ लाभेल. व्यवसाय वाढेल.

**मीन :** विरोधकांवर मात कराल. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. कामात यश नक्की मिळेल.

# शब्दगंध क्र. ७४९३

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | ५ | |
| ६ | | ■ | ७ | | | | ■ |
| | ■ | ८ | | | ■ | ■ | ९ |
| १० | | | ■ | ११ | १२ | १३ | |
| | ■ | १४ | १५ | ■ | १६ | | ■ |
| ■ | १७ | | | १८ | | ■ | १९ |
| २० | | | ■ | | ■ | २१ | |
| २२ | | ■ | २३ | | | | |

**आडवे शब्द :-** १) जमावाने केलेली दगडफेक, जाळपोळ, भोसकाभोसकी वगैरे प्रकार ३) सुंदर; रमणीय ६) भीती; भय ७) निष्णात; कुशल; तरबेज ८) उसंत; फुरसत १०) भरपूर; खूप; पुष्कळ ११) ताप येण्यापूर्वीची स्थिती १४) घोडशाळा; घोडेस्वारांची टोळी १६) समय; वेळ; मृत्यू; कालावधी १७) सायंकाळ; संध्याकाळ २०) उखळात कांडण्यासाठी वापरले जाणारे लाकडी साधन २१) अनेक पाय असलेला एक कीटक २२) तुरुंग; जेल; बंदिशाला २३) खरमरीत; झणझणीत; झोंबणारे; स्पष्ट

**उभे शब्द :-** १) नर्मदा व गोदावरी या नद्यांच्या चिमट्यातील प्रदेशापासून थेट खाली दक्षिणेस लांबपर्यंत पूर्वीच्या काळी पसरलेले जंगल २) फळातील रसाळ भाग; मगज ३) चषक; ढाल; कप ४) नंतर; पुन्हा ५) योग्य; नीती ७) बेकरीत तयार होणारा एक खाद्यपदार्थ ८) सटसटीत एकेरी अंगाचा; काटकोळा ९) गावाचे प्रवेशद्वार १२) सूर्योदयानंतरचा काही काळ १३) तीव्र उठणारी वेदना; सणक; तिडीक १५) थंड; शीत १७) बैलाला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या शिंगाला बांधतात ती दोरी १८) बैलाच्या नाकातून ओवतात ती दोरी १९) मंजूर; पारित; मान्य २०) ज्याला बोलता येत नाही असा २१) पोते

### शब्दगंध क्र. ७४९२ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | म | का | ■ | का | सा | वि | स |
| ह | र | क | त | ■ | ग | ■ | र |
| म | ण | ■ | र | मा | र | म | ण |
| दा | ■ | प | ट | ■ | ■ | ग | ■ |
| बा | ज | री | ■ | ■ | प | र | त |
| द | ळ | ■ | गो | क | र्ण | ■ | ळ |
| ■ | गा | व | रा | न | ■ | धा | म |
| रा | व | ण | ■ | क | ळ | क | ळ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नव्हे, तर चांगला माणूस बनून समाजात वावरणे होय.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विजेच्या तारेवर बसणाऱ्या पक्षाला धक्का का लागत नाही?

आकाशात मुक्तपणे उडणारे पक्षी जेव्हा रस्त्यावरील किंवा खांबांवरील विजेच्या तारांवर सहजरीत्या बसतात, तेव्हा आपल्या मनात हा प्रश्न नक्कीच येतो की, ज्या तारेमध्ये एवढा प्रचंड विजेचा प्रवाह असतो, त्यावर बसूनही पक्षाला विजेचा धक्का कसा लागत नाही? यामागे विज्ञानाचा एक अत्यंत मूलभूत आणि रंजक नियम दडला आहे.

विजेचे स्वरूप आणि तिचा स्वभाव समजून घेतल्यास याचे उत्तर सहज मिळते. वीज ही नेहमी उच्च दाबाकडून कमी दाबाकडे वाहते आणि तिच्या प्रवासासाठी तिला एका अखंड मार्गाची गरज असते. विजेचा प्रवाह तेव्हाच सुरू होतो, जेव्हा तो मार्ग सुरुवातीपासून शेवटापर्यंत पूर्ण होतो. जर हा मार्ग मध्येच तुटला किंवा अपूर्ण राहिला, तर वीज वाहू शकत नाही.

पक्षी जेव्हा एखाद्या विजेच्या तारेवर जाऊन बसतो, तेव्हा त्याचे दोन्ही पाय एकाच तारेवर असतात. यामुळे त्याच्या शरीराचा संपर्क फक्त एकाच तारेतील विजेच्या प्रवाहाशी येतो. पक्षी हवेत असल्यामुळे त्याचा जमिनीशी किंवा इतर कोणत्याही वस्तूशी कोणताही थेट संपर्क नसतो. अशा वेळी विजेला पक्षाच्या शरीरातून पुढे जाऊन स्वतःचा मार्ग पूर्ण करण्यासाठी किंवा जमिनीकडे जाण्यासाठी कोणताही पर्याय उपलब्ध नसतो. त्यामुळे वीज पक्षाच्या शरीरात न शिरता परस्पर तारेतूनच पुढे निघून जाते आणि पक्षी सुरक्षित राहतो.

या शास्त्रीय तत्त्वाला आपण आणखी एका प्रकारे समजून घेऊ शकतो. वीज ही नेहमी सर्वात सोपा आणि कमी अडथळा असलेला मार्ग निवडते. पक्षाच्या शरीराच्या तुलनेत तांब्याची किंवा ॲल्युमिनियमची तार ही विजेच्या वहनासाठी अत्यंत उत्तम माध्यम असते. तारेमधून वाहताना विजेला खूप कमी अडथळा येतो, तर पक्षाच्या शरीरातून वाहताना जास्त अडथळा असतो. त्यामुळे वीज पक्षाच्या शरीरात प्रवेश न करता तारेच्या सोप्या मार्गानेच वाहणे पसंत करते.

मात्र, हीच परिस्थिती एका विशिष्ट स्थितीत गंभीर बनू शकते. जर एखाद्या पक्षाने एकाच वेळी दोन वेगवेगळ्या तारांना स्पर्श केला, किंवा एका तारेवर बसलेले असताना त्याचा पंख, चोच किंवा पाय जवळच असलेल्या विजेच्या खांबाला, जमिनीला किंवा दुसऱ्या तारेला लागला, तर विजेचा अपूर्ण असलेला मार्ग तात्काळ पूर्ण होतो. अशा वेळी वीज पक्षाच्या शरीरातून अत्यंत वेगाने जमिनीच्या किंवा दुसऱ्या तारेच्या दिशेने वाहू लागते. प्रवाहाची साखळी पूर्ण होताच पक्षाला अतिशय तीव्र धक्का बसतो आणि त्याचा मृत्यूही होऊ शकतो.

थोडक्यात सांगायचे तर, विजेचा धक्का बसण्यासाठी केवळ तारेला स्पर्श होणे पुरेसे नसते, तर विजेचा प्रवाह शरीरातून बाहेर पडण्यासाठी मार्ग उपलब्ध असणे आवश्यक असते. पक्षी एकाच तारेवर बसून हवेत तरंगत्या स्थितीत असल्यामुळे विजेचा प्रवाह अपूर्ण राहतो आणि त्यामुळेच पक्षी विजेच्या प्राणघातक धक्क्यापासून पूर्णपणे सुरक्षित राहतात.

## सोन्याचा आंबा

रामनगर नावाच्या एका लहानशा गावात ाधव नावाचा एक गरीब पण अत्यंत प्रामाणिक ळविक्रेता राहत होता. तो रोज जंगलातून आणि आसपासच्या बागां मधून ताजी फळे गोळा करून ाजारात विकायचा. त्याच्या प्रामाणिकपणामुळे ावातल्या प्रत्येकाला त्याच्याबद्दल खूप आदर होता.

एकदा उन्हाळ्याच्या दिवसांत माधव जंगलातून फळे गोळा करत असताना एका मोठ्या आंब्याच्या झाडाखाली विसावला. तिथल्याच एका झुडपात त्याला एक जुनी, कपड्याची पिशवी सापडली. ती पिशवी उघडून पाहताच माधव थक्क झाला; त्यात सोन्याची नाणी आणि एक मौल्यवान हिऱ्याची अंगठी होती.

माधवच्या मनात क्षणभरही तो पैसा स्वतःकडे ठेवण्याचा विचार आला नाही. हे धन ज्याचे आहे, तो नक्कीच चिंतेत असेल, असा विचार करून त्याने ती पिशवी उचलली आणि थेट गावातील पाटलांकडे (सरपंचांकडे) घेऊन गेला.

त्याच दिवशी शेजारच्या गावातील एक श्रीमंत व्यापारी पाटलांच्या घरी आपली हरवलेली पिशवी शोधत आला होता. माधवने ती पिशवी पाटलांसमोर त्या व्यापाऱ्याच्या हवाली केली. व्यापाऱ्याने नाणी मोजून पाहिली, ती अगदी बरोबर होती. माधवच्या या प्रामाणिकपणावर खूश होऊन व्यापाऱ्याने त्याला बक्षीस म्हणून सोन्याची काही नाणी देऊ केली, पण माधवने ती नम्रपणे नाकारली.


तो म्हणाला, दुसऱ्याच्या वस्तूवर माझा कोणताही अधिकार नाही. मी फक्त माझे कर्तव्य पार पाडले.

व्यापाऱ्याला माधवच्या या स्वभावाचे खूप कौतुक वाटले. त्याने विचार केला की, अशा प्रामाणिक माणसाला केवळ पैशाचे बक्षीस देणे योग्य नाही. व्यापाऱ्याने मदतीचा एक वेगळा मार्ग निवडला. त्याने माध्यावला गावातली एक मोठी आंब्याची बाग कायमची भेट म्हणून दिली आणि त्याला आपल्या सर्व फळांच्या व्यापारात मुख्य भागीदार बनवले.

काहीच दिवसांत माधवच्या प्रामाणिकपणाची बातमी आसपासच्या सर्व गावांत पसरली. लोक केवळ ताज्या फळांसाठीच नव्हे, तर त्याच्या प्रामाणिकपणावर असलेल्या विश्वासामुळे त्याच्याकडूनच फळे खरेदी करू लागले. बघता बघता माधवचा व्यवसाय खूप वाढला आणि त्याला कधीही गरिबीचा सामना करावा लागला नाही.

तात्पर्य : प्रामाणिकपणा हा केवळ एक गुण नाही, तर ते एक असे बीज आहे ज्याचे फळ माणसाला आयुष्यात कायम गोड आणि समृद्ध जीवन देते. तात्पुरत्या लाभापेक्षा प्रामाणिकपणाने मिळवलेला सन्मान आणि यश आयुष्यभर सोबत राहते.

## आत्मशक्ति



### बळी आणि बोध

प्राण्यात आत्मा असतो म्हणून माणसांप्रमाणे जगण्याचा त्यांना अधिकार असतो. ते कर्मविधानावर विश्वास ठेवतात. कर्मविधानानुसार प्रत्येक कर्माचा हिशोब चुकता करावा लागतो असेच ते मानतात. बौद्ध धर्मातील जातक कथांत अशाच प्रकारची एक गोष्ट आली आहे. प्राचीन काळात काही लोक आपल्या मृत नातेवाईकांसाठी काही जनावरांचे बळी चढवीत. एके दिवशी एका गुरुने आपल्या शिष्याला सांगितले, 'मला एक बोकड बळी चढवायचा आहे, तेवढा तू घेऊन ये. बोकडाला नदीत आंघोळ घाल व तो पुरता स्वच्छ झाल्यावर त्याच्या गळ्यात फुलाची माळ घाल.' गुरुची आज्ञा शिरोधार्य मानून शिष्य बोकड शोधण्यासाठी बाहेर पडला. बोकड मिळाल्यावर गुरुने सांगितल्याप्रमाणे त्याने सर्वकाही केले.

स्नान घालून बोकड्याला तयार करीत असतांना तो बोकडा हसु लागला व त्यानंतर तो रडू लागला. त्यामुळे तो शिष्य आश्चर्यचकित झाला.बोकडाचे विचित्र वागणे पाहून शिष्याने विचारले, 'अरे बोकडा, तू प्रथम हसलास आणि त्यानंतर रडू लागलास ह्याम ागचे कारण काय ?

'बोकडाने उत्तर दिले, हाच प्रश्न तू मला तुझ्या गुरुंच्या समोर विचार. शिष्याने त्या बोकडाला गुरुकडे नेले व त्याच्या त्या अजब वागण्याबद्दल गुरुला सांगितले.गुरुंनी विचारले, हे बोकडा, तू प्रथम हसलास व नंतर रडलास त्याचे काय कारण आहे ?

बोकडाने सांगितले, मी पूर्वजन्मी तुझ्यासारखाच गुरु होतो. मलाही बोकड चढविण्याची इच्छा झाली होती. म्हणून मी एका बोकडाला ठार मारले. त्यामुळे मला ५० वेळा माझे मस्तक कापून घेऊन मरावे लागणार होते. हा माझा ५००वा व शेवटचा जन्म आहे. मी केलेल्या कुकर्मापासून मी आज मुक्त होणार म्हणून आनंदाने हसतो.गुरुने विचारले, मग त्यानंतर तुला रडू का आले ?बोकड उत्तरला, मला मारल्यावर तुम्हांलाही ५०० वेळा मरावे लागेल ह्या विचाराने मी दुःखी झालो म्हणून मला रडू आले.हे ऐकून गुरु घाबरले व निश्चय करून म्हणाले, बोकडा, घाबरू नकोस ! मी

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नवीन जीवनाचे पोषण

सुरेश ओबेरॉय : मी एका घटनेचा मागे उल्लेख केला होता ज्यात मी आमच्या मदतनिसाला रागावलो आणि माझा १ महिन्यांचा नातू त्यानंतर खूप वेळ अस्वस्थ होता. मी दुसऱ्या कोणावरतरी ओरडलो म्हणून बाळावर एवढा परिणाम का व्हावा ?

शिवानीदीदी : आपल्या कुटुंबात जन्म घेणारा आत्मा येताना स्वतःचे संस्कार घेऊन येतो. सगळ्या मुलांमध्ये सारख्याच प्रमाणात अस्वस्थता दिसत नाही. तरंगांचा परिणाम होतो पण प्रत्येक आत्म्याला वाटलेल्या अस्वस्थतेची पातळी समान नसते. काही मुलं इतर मुलांपेक्षा जास्त हळवी असतात, त्यामुळे त्यांच्यात लवकर दुखावलं जाण्याचा संस्कार असतो. ज्या क्षणी आत्म्याला मोठ्यांमध्ये होत असलेल्या वादाची जाणीव होते, तेव्हा तो दुखावला जातो आणि रडायला लागतो.

सुरेश ओबेरॉय : असं मूल एखाद्या तणावाखाली असलेल्या माणसाच्या मांडीवर बसायलाही तयार होत नाही.

शिवानीदीदी : याचा अर्थ, त्या बाळाकडे तरंग ग्रहण करण्याची शक्ती जास्त आहे. आपल्याला या आत्म्याला खूप शक्तिशाली बनवावं लागेल कारण त्याला अजून अनेक गोष्टींना तोंड द्यायचं आहे. त्याच्यात शक्ती आहे आणि त्यामुळे बाह्य गोष्टींचा प्रभाव लगेच पडतो.

शिवानीदीदी :

संस्कार कुठून झाला हे फार महत्त्वाचं नाही. बाळ खूप लहान असल्याने त्याने तो संस्कार बहुतेककरून त्याच्या पूर्व जन्मातून आणलेला असणार. कदाचित ते बाळ आधी (मागच्या जन्मात, जेव्हा हा आत्मा दुसऱ्या शरीरात होता) डोंगरदऱ्यांमधल्या गावांत असतं तसा अतिशय शांत वातावरणात राहिलं असेल. ज्यामुळे त्याला गोंगाटाचा आणि संतापाचा फारसा अनुभव नसेल. डोंगरदऱ्यांमधले लोक खूप साधे असतात. ते शांततापूर्ण सहजीवन जगतात. ते अत्यंत गोड स्वभावाची असतात. जर अशा ठिकाणच्या आत्म्याने शरीर सोडलं आणि तो मुंबई किंवा दिल्ली यांसारख्या शहरांत जन्माला आला, जिथे प्रचंड आवाज आणि लगबग असते, तर त्याच्यासाठी हा संपूर्णपणे सांस्कृतिक बदल असेल.

सुरेश ओबेरॉय : कदाचित सांस्कृतिक धक्का असेल.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंडू : अरे गण्या, मला सांग 'Study' आणि 'Bank' मध्ये काय साम्य आहे?

गण्या : मला नाही माहित, तूच सांग!

बंडू : सोपं आहे रे! दोन्हींमध्ये थोडं पण 'Interest' दाखवला नाही, तर अकाउंट बंद होतं!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* महाराष्ट्रातील खालीलपैकी कोणत्या जिल्ह्याला 'तलावांचा जिल्हा' म्हणून ओळखले जाते? – भंडार

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### ज्वारी

६) मूळव्याधीतून जर रक्त पडत असेल, तर अशा वेळी ज्वारीच्या दाण्यांचा मऊ भात शिजवून खावा. याने रक्त पडणे बंद होऊन अशक्तपणा दूर होतो.

७) तापामध्ये घाम येण्यासाठी ज्वारीच्या लाह्यांच्या पिठाचा काढा करून प्यावा. हा काढा घेतल्याने घाम येऊन ताप उतरतो.

८) ज्वारी सारक गुणधर्माची असल्याने मलावष्टंभाची तक्रार असणाऱ्या रुग्णांनी खाल्ल्यास शौचास साफ होऊन मलावरोधाची तक्रार दूर होते. यामध्ये असणाऱ्या सेल्युलोज, 'ब' जीवनसत्त्व व फायबर या घटकांमुळे शौचास साफ होते.

९) पांढरी ज्वारी मूळव्याध, अरुची, गुल्म, व्रण व ताप विकारांवर गुणकारी आहे. या विकारांमध्ये ती शक्ती देणारी असून पथ्यकारक आहे.

१०) लाल ज्वारी मधुर, शीतल, बलवर्धक, त्रिदोषनाशक, कफहारी, पौष्टिक असते.

११) ज्वारीपासून भाकरी, थालीपीठ, चकल्या, लाह्या, लाह्यांचा चिवडा, धिरडे, पापड्या असे शरीरास गुणकारी अनेक पदार्थ बनविता येतात.

सावधानता :

ज्वारी मधुर, शीत गुणात्मक, कफ व वातकारक असल्याने अति प्रमाणात खाल्ल्यास वातप्रकोप होऊन अपचन होऊ शकते. ती शरीरास गुणकारी ठरावी याकरिता तिच्यापासून पदार्थ बनविताना साजूक तुपाचा वापर करावा. यामुळे जाठराग्नी प्रदीप्त होऊन अपचन, पोटात गॅस धरणे, रूक्षता जाणवणे हे विकार दूर होतात. ज्वारीच्या भाकरीवर नेहमी गायीचे एक चमचा तूप घालून ती भाकरी खावी.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# 'अहिल्याभवना'तून नारीशक्तीला मिळणार अधिक बळ

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, महिला व बालविकास भवनाचे भूमीपूजन



महिला व बालविकास भवन (अहिल्याभवन) इमारतीच्या भूमीपूजन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील समवेत मान्यवर.

नगर – नारीशक्ती देशाच्या विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असून स्त्री ही सन्मानाचे प्रतीक आहे. मातृशक्तीचे सक्षमीकरण झाल्याशिवाय सर्वांगीण विकास शक्य नाही. महिलांच्या उत्कर्षाचे काम 'अहिल्याभवना'तून होणार असल्याने या नारीभवनाच्या माध्यमातून नारीशक्तीला बळकटी मिळणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महिला व बालविकास भवन (अहिल्याभवन) इमारतीच्या भूमीपूजन सोहळ्यात कोनशिलेचे अनावरण केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी आमदार संग्राम जगताप, आमदार श्रीमती मोनिका राजळे, महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेसही पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

### अहिल्याभवनासाठी १५ कोटींचा निधी

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले की, महिला व बालविकास भवनासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. देशाच्या विकासामध्ये मातृशक्तीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोविडच्या काळात अंगणवाडी सेविकांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महिलांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजना ग्रामीण भागातील महिलांपर्यंत पोहोचविण्यासोबतच आरोग्यविषयक जनजागृतीचे कामही अंगणवाडी सेविका प्रभावीपणे करत आहेत. महिलांना शेतकऱ्याचा दर्जा देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला असून, त्यातून महिला शक्तीचा सन्मान झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

### बचतगटांच्या उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी

बचतगटांच्या उत्पादनांची विक्री केवळ स्टॉलपुरती मर्यादित न ठेवता त्यांना ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांच्या यशोगाथा तयार करून त्या इतर महिलांपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे. अशा यशोगाथांमुळे समाजात सकारात्मक जागृती निर्माण होईल, असे पालकमंत्री म्हणाले. बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक जाणीव निर्माण करणे आवश्यक आहे. बालविवाह रोखणे हे केवळ प्रशासनाचे काम नसून समाजातील प्रत्येकाचे कर्तव्य आहे. सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून बालविवाहाला हद्दपार करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही डॉ. विखे पाटील यांनी केले.

### अहिल्याभवनातून १४ कार्यालये एकाच छताखाली

आमदार संग्राम जगताप यांनी अहिल्याभवनासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांचे आभार मानले. या इमारतीच्या माध्यमातून महिला व बालविकास विभागाच्या कामाला निश्चितच गती मिळेल. विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार श्रीमती मोनिका राजळे म्हणाल्या की, 'अहिल्याभवना'च्या माध्यमातून शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. जनतेच्या समस्यांना न्याय देण्यासाठी या वास्तूचा प्रभावी उपयोग झाला पाहिजे. इमारत लवकरात लवकर पूर्ण व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. अहिल्यानगर जिल्ह्याला ऐतिहासिक महत्त्व असल्याने जिल्ह्यातील पुरातन वास्तूंचे संवर्धन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बालविकास अधिकारी संजय कदम यांनी प्रास्ताविकात सांगितले की, महिला व बालविकास विभागांतर्गत असलेली १४ कार्यालये एकाच छताखाली येणार आहेत. त्यामुळे नागरिकांच्या वेळेची तसेच पैशांची बचत होऊन विविध शासकीय सेवांचा लाभ अधिक सुलभपणे मिळणार आहे.

जिल्ह्यात पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बालविवाहमुक्त अभियानाची सुरुवात करण्यात आली असून, त्यावेळी नागरिकांना बालविवाहमुक्तीची शपथ देण्यात आली होती. हे अभियान अधिक जोमाने राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेत जिल्ह्याने उद्दिष्टापेक्षा अधिक काम केले असून, जिल्ह्यातील २० हजार ६१६ बचतगटांना कर्जवाटप करण्यात आले आहे. प्रतिपालकत्व योजनेत ५४ कोटी रुपयांचे सहाय्य देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमास महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पुंडलिक महाराज जंगले, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रीमती बारस्कर यांच्यासह नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



केडगावच्या भाग्योदय विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी मोफत खगोलीय प्रदर्शन व कृत्रिम तारांगण कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्राचार्य ज्ञानदेव बेरड.

# तारांगणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अनुभवली विश्वाची रोमांचकारी सफर

नगर – विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड निर्माण होऊन खगोलशास्त्राबाबत जिज्ञासा वाढावी, तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा या उद्देशाने केडगाव येथील भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भाग्यश्री रोलिंग मिलच्या सहकार्याने इयत्ता पहिली ते बारावीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी मोफत खगोलीय प्रदर्शन व कृत्रिम तारांगण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विश्वाची अद्भुत सफर अनुभवली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड, रेणुका माता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब कोतकर, गोविंद कदम, भूगोल विभागाचे प्राध्यापक एकनाथ होले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य ज्ञानदेव बेरड म्हणाले, भूगोल ही जगाची खिडकी आहे. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान समजून घेणे आवश्यक आहे. या तारांगणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चंद्र, ग्रह, तारे, आकाशगंगा तसेच चांद्रयान–३ मोहिमेची माहिती प्रभावीपणे पाहता व समजता येत आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, सृजनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो. भविष्यात विज्ञान व अवकाश संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणाही त्यांना मिळते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एकनाथ होले यांनी केले. त्यांनी कृत्रिम तारांगणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विश्व, ग्रह–तारे, सूर्य, चंद्र, आकाशगंगा तसेच चांद्रयान–३ मोहिमेची माहिती दृकश्राव्य पद्धतीने अनुभवता आली. अशा उपक्रमांमुळे विज्ञानातील नवनवीन संशोधनांची ओळख होऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानकक्षा अधिक व्यापक होतात. प्रत्येक विद्यार्थ्याने जिज्ञासू वृत्ती जोपासून विज्ञानाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोरख कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, संतोष काकडे, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, गणेश गायकवाड, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड तसेच विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अवकाश विज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले.

# नृत्य साधक आयोजित गुरुपौर्णिमा गुरुगौरव व नृत्य समर्पण सोहळा साजरा

नगर – नृत्य साधक आयोजित श्री गुरुभ्यो नमः या मंगलमय भावनेतून गुरुपौर्णिमा गुरुगौरव व नृत्य समर्पण सोहळा उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, व नटराज पूजनाने झाली. त्यानंतर भरतनाट्यम आणि कथ्थक च्या विद्यार्थ्यांनी गुरु वंदना तसेच विविध शास्त्रीय नृत्याविष्कार सादर करून गुरुतत्त्वाला अभिवादन केले. विद्यार्थ्यांच्या सुरेख सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

यावेळी भारतीय शास्त्रीय नृत्यकलेच्या संवर्धनासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, शिस्त आणि कलाभक्ती रुजविण्यासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल ज्येष्ठ भरतनाट्यम् गुरू श्रीमती सुरेखा रवी डावरे यांना कला साधना गुरु सन्मान २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

कार्यक्रमात कु. उत्कर्षा दगडे यांनी संत कबीरदास रचित गुरू बिन कौन दिखावे बाट हे भावपूर्ण भजन सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच कार्यक्रमाची सांगता सौ. मानसी थत्ते यांनी त्यांच्या सुमधुर आवाजात भजन सादर करून भक्तिमय वातावरणात केली.

या प्रसंगी गुरू–शिष्य परंपरेचे महत्त्व, भारतीय संस्कृतीचे जतन आणि शास्त्रीय नृत्यकलेचे संवर्धन याविषयी श्रीमती सुरेखा डावरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्या म्हणाल्या की, अहिल्यानगर शहरात भारतीय शास्त्रीय नृत्यकलेचा प्रसार होण्याच्या दिशेने 'नृत्य साधक' संस्थेतर्फे सुरू असलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. अशा उपक्रमांमुळे शास्त्रीय नृत्य अधिकाधिक नृत्यसाधकांपर्यंत पोहोचून त्याच्या संवर्धन व भरभराटीस निश्चितच हातभार लागेल. त्यांनी नृत्य साधक संस्थेच्या कार्याचे मनापासून कौतुक करत आयोजकांना आणि सर्व नृत्यसाधकांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, रसिक प्रेक्षक आणि मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे आयोजन कु. आश्लेषा पोतदार, सौ. अपर्णा थत्ते, सौ. कविता भांबरे–घोलप आणि कु. उत्कर्षा दगडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आशिष पोतदार, रीमा कुलकर्णी, सुजाता रेपे, सुजाता कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सौ. अपर्णा थत्ते यांनी सर्व मान्यवर, विद्यार्थी, पालक आणि उपस्थितांचे आभार मानले.



ज्येष्ठ भरतनाट्यम् गुरू श्रीमती सुरेखा रवी डावरे यांना कला साधना गुरु सन्मान २०२६ प्रदान करताना नृत्य साधक संस्थेचे पदाधिकारी.

# नगरसह राज्यभर सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारणार

## शरद पवळे यांची माहिती, 'मिशन झिरो पेण्डन्सी'अभियानाला वेग देणार



नगर तालुक्यात आयोजित राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण सभेत बोलताना शरद पवळे.

नगर – राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीपर्यंत दर्जेदार सिमेंटचा शेतरस्ता पोहोचविण्याचा संकल्प महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने केला असून, अहिल्यानगरसह संपूर्ण राज्यात सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारण्यासाठी व्यापक जनजागृती, मार्गदर्शन आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली.

नगर तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण व 'मिशन झिरो पेण्डन्सी' अभियानाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभियानात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवत शेतरस्त्यांशी संबंधित विविध समस्या, अडचणी आणि प्रलंबित प्रकरणे मांडली.

यावेळी बोलताना शरद पवळे म्हणाले की, राज्यातील हजारो शेतकरी आजही शेतरस्त्याअभावी स्वतःच्या शेतीपर्यंत सहज पोहोचू शकत नाहीत. अनेक सुपीक जमिनी केवळ रस्त्यांच्या अभावामुळे पडिक राहिल्या आहेत. शेतरस्त्यांशी संबंधित अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रशासकीय कार्यालयांमध्ये प्रलंबित असून, काही ठिकाणी चुकीच्या निर्णयांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ सातत्याने संघर्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संघर्षामुळे शासनाने शेतरस्त्यांसंदर्भात काही महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असले, तरी त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रत्येक पात्र शेतकऱ्याला हक्काचा शेतरस्ता मिळावा, प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली निघावीत आणि राज्यात 'मिशन झिरो पेण्डन्सी' यशस्वी व्हावे, यासाठी चळवळीचे पदाधिकारी राज्यभर जनजागृतीसह प्रशासनाशी समन्वय साधत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अभियानादरम्यान शेत–रस्त्यांबाबतचे शासन निर्णय, संबंधित कायदेशीर तरतुदी, हद्द निश्चितीची प्रक्रिया, अतिक्रमण हटविण्याची कार्यपद्धती तसेच शेतकऱ्यांनी करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या अभियानाला शरद पवळे, आशिष कासार, बाळासाहेब थोरात, पोपट शेळके, अक्षय जगताप, सचिन शेळके, सोमनाथ तोडमल, गणेश इंगळे, एकनाथ पवार, रामदास तनपुरे, विठ्ठल मिसाळ, दादासाहेब शिरसाठ, गोवर्धन शिरसाठ, कृष्णा चव्हाण, राजेंद्र शिरसाठ, जालिंदर आठरे, राहुल गट, आंबादास आव्हाड, विक्रांत कासार यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त दिल है हिंदुस्तानी देशभक्तीपर गीतांची रंगणार सुरेल मैफल

नगर – स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला नगरकर रसिकांसाठी एक खास सांगीतिक पर्वणी – दिल है हिंदुस्तानी या देशभक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन १३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृहात करण्यात आले आहे. पी. आर. मिडिया आणि ऑरेंज इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने गेली आठ वर्षे या कार्यक्रमाचा गौरवशाली ठसा दरवर्षी उमटत आहे.

या वर्षीही, देशप्रेमाचा सूर आणि स्वातंत्र्याच्या लढ्याची गाथा संगीताच्या माध्यमातून मांडणारी ही मैफल नगरच्या सांस्कृतिक जीवनात एक उजळ क्षण ठरणार आहे. या मैफलीचे उद्घाटन प्रसिद्ध व्याख्याते डॉ. संजय कळमकर डॉ. बापूसाहेब कांडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी अजिनाथ हजारे, कडुभाऊ काळे, किरण वर्पे, डॉ. दमन काशीद, संतोष शिंदे, ज्ञानेश्वर गाडे, डॉ. प्रदीप इंगळे, डॉ. हेमंत इंगळे, अजय गावडे, आशिष शिंगवी, डॉ. इमरान शेख, विशाल बुऱ्हाडे, प्रा. रवींद्र काळे, गणेश गायकवाड, डॉ. स्नेहा शिरसाठ, डॉ. सागर शिरसाठ, डॉ. संतोष गांगर्डे, आदी ठोंबे, धनेश खत्ती, किरण गवते, भूषण ओसवाल, रोहित भगत, अमोल खोले, तुषार चोरडिया, निलेश चिप्पा, अभिषेक शेलार, ॲड. हेमंत कराळे, ॲड. सचिन चंदनशिव, अविनाश कराळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती प्रा. आदेश चव्हाण यांनी दिली.

या कार्यक्रमात अजरामर देशभक्ती गीतांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा इतिहास, शौर्यगाथा आणि देशप्रेम व्यक्त केलं जाणार आहे. गायक कलाकार म्हणून प्रा. आदेश चव्हाण, डॉ. दमन काशीद, भाग्यश्री डुंबारे (पुणे), रेणुका पवार, जालिंदर शिंदे, सागर मेहेत्रे, सागर होनराव, आरती पेरेपाडम यांची सुरेल गायन मैफल रंगणार आहे.

कार्यक्रमाचे संगीत संयोजन निलेश सोज्वळ आणि एडविन पेरेपाडम यांनी केलं असून फरहान शेख, सिद्धांत गायकवाड, विशाल बोर्डे, श्रीकांत गडकरी, अमित बरुआ हे कलाकार साथसंगत सादर करणार आहेत.


सूत्रसंचालन रियाज पठाण व प्रा. रवींद्र काळे करणार असून, त्यांच्या खास शैलीतून मैफलीला एक वेगळाच रंग चढणार आहे. मोफत प्रवेशिका नागेबाबा मल्टीस्टेट आणि माऊली कॅन्टीन येथे उपलब्ध असून, अधिक माहितीसाठी ९८८१७२५६९६ / ९८२२६४७८१५ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक रियाज पठाण (पी. आर. मिडिया) आणि जालिंदर शिंदे (ऑरेंज इव्हेंट्स) यांनी केले आहे.




## शार्विल मुळे यास तायक्वांदो चॅंपियनशिप स्पर्धेत सुवर्णपदक

भिंगारचे सुपुत्र शार्विल हर्षल मुळे (इयत्ता १०वी) पवार पब्लिक स्कूल नांदेड सिटी पुणे याने बालेवाडी स्टेडियम येथे झालेल्या तायक्वांदो चॅंपियनशिप स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. भिंगार येथील स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रमोद श्रीपाद मुळे यांचा शार्विल हा नातू आहे.

## क्रॅपिंग कुस्ती स्पर्धेत शांभवी हुच्चे हिचे यश




नाशिक – नाशिक येथे मिनाताई ठाकरे स्टेडियममध्ये झालेल्या क्रॅपिंग कुस्ती स्पर्धेमध्ये इ.५ वी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. शांभवी जनक हुच्चे ही प्रथम क्रमांकाने विजयी झाली आहे. तिची राज्य पातळीवरील स्पर्धेकरीता निवड झाली. ८ ते १२ वयोगटात ही स्पर्धा झाली.

स्पर्धेसाठी नाशिक जिल्ह्यातील ३००–४०० मुला–मुलींनी सहभाग घेतला होता. गवळी समाज बांधवांनी शांभवी हिचे अभिनंदन केले आहे. शांभवी ही माजी नगरसेवक जगन बबनराव हुच्चे यांची नात असून ती नाशिक येथे शिक्षण घेत आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# वर्षभरात ४६ हजार ७५५ जातवैधता प्रकरणे निकाली

## जिल्हा जात पडताळणी समितीची उल्लेखनीय कामगिरी

कोपरगाव येथे सध्या विद्यार्थ्यांच्या बारावी विज्ञान शाखेसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली असून, या पार्श्वभूमीवर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रलंबित प्रकरणे वेगाने निकाली काढली आहेत. १ एप्रिल २०२५ ते जून २०२६ या कालावधीत समितीकडे प्राप्त झालेल्या एकूण ४८ हजार ६४४ प्रकरणांपैकी तब्बल ४६ हजार ७५५ प्रकरणे यशस्वीरित्या निकाली काढण्यात आली आहेत. सद्यस्थितीत केवळ १ हजार ८८९ प्रकरणे प्रक्रियेत असून, ज्या अर्जांमध्ये त्रुटी आहेत त्या अर्जदारांना ऑनलाइन प्रणालीद्वारे तत्काळ सूचित करण्यात आले आहे.

अहिल्यानगर येथील जात पडताळणी समिती कार्यालयाकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होत आहे. जात पडताळणी समितीच्या अध्यक्षा तथा अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, सदस्य तथा समाजकल्याण उपआयुक्त बलभीम शिंदे आणि समितीचे सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी अनिल तिदमे यांच्या मार्गदर्शनाखाली जातवैधता पडताळणीचे कामकाज अत्यंत पारदर्शक व गतिमान पद्धतीने सुरू आहे. असे असूनही काही व्यक्ती विनाकारण समितीची बदनामी होईल या हेतूने माध्यमांतून चुकीचा संदेश पसरवत असल्याचे निदर्शनास आले असून, त्यांचा समिती लवकरच बंदोबस्त करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांची प्रकरणे निकाली काढण्याला समितीने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाइन पाठवूनही ते चौकशीसाठी प्रत्यक्ष कार्यालयात येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कार्यालयात हेलपाटे न घालता स्वतःच्या लॉगिन आयडी व पासवर्डचा वापर करून अर्जाची सद्यस्थिती तपासावी, असे आवाहन समितीने केले आहे. तसेच, सीईटीद्वारे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्जाची प्रत, पुराव्यांची प्रमाणित कागदपत्रे आणि मूळ शपथपत्र समितीच्या नागरी सुविधा केंद्रात जमा करावे, असे आवाहन संशोधन अधिकारी अनिल तिदमे यांनी केले आहे.

जातवैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज क्रमांक १५–अ (प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह), उमेदवाराचे दोन शालेय दाखले (प्राथमिक व माध्यमिक), वडिलांचा शालेय दाखला किंवा टी.सी., तसेच जातीनुसार आवश्यक जुने पुरावे (ओबीसी उमेदवारांसाठी सन १९६७, विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी १९६१, तर अनुसूचित जातींसाठी सन १९५० पूर्वीचा पुरावा) आवश्यक आहेत. याशिवाय आजोबा, चुलते किंवा वडील यांच्यापैकी एकाचे मूळ जात प्रमाणपत्र, कुटुंबातील जातवैधता प्रमाणपत्र, आणि वडील निरक्षर असल्यास शंभर रुपये स्टॅम्प पेपरची आवश्यकता नसलेले साध्या कागदावरील नोंदणीकृत शपथपत्र चालणार आहे. गरज भासल्यास भाऊ, बहीण वा वडिलांचे शालेय दाखले, जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र जोडता येईल.

विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरताना स्वतःचा चालू मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी नोंदवावा आणि दलाल किंवा त्रयस्थ व्यक्तींकडे काम देणे टाळावे. ऑनलाइन अर्जाची हार्ड कॉपी अहिल्यानगर जात पडताळणी समिती कार्यालयात जमा करावी तसेच ऑनलाइन कळविलेल्या त्रुटी निश्चित कालावधीत दूर करून कागदपत्रे अपलोड करावीत. कागदपत्रे अपलोड केल्यावर अर्जाची स्थिती मोबाईलवर तपासता येऊ शकते, ज्यामुळे प्रवेश प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही, असे संशोधन अधिकारी अनिल तिदमे यांनी स्पष्ट केले आहे.

**– अनिल तिदमे,**
सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती,
अहिल्यानगर

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


# गरमागरम मूग डाळ टिक्की

झटपट रेसिपी

दोस्तांनो, शिक्षण किंवा नोकरीनिमित्ताने बाहेरगावी रहाताना घरच्या चवीची आठवण येत असते. रोजच्या धावपळीत झटपट होणारे तेच ते पदार्थ खावे लागतात. मात्र एखाद्या दिवशी निवांत वेळ असल्यावर तुमच्यातला शेफ जागा होतो. मग एखादी वेगळी रेसिपी ट्राय करता येते. अर्थात ही रेसिपी पौष्टिकही असायला हवी. म्हणूनच प्रथिनयुक्त डाळीपासून टिक्की बनवता येईल. यासाठी मूग डाळ वापरता येईल. चला तर मग मूग डाळीची टिक्की बनवू या.

**सामग्री:** एक वाटी मूग डाळ, आल्याचा छोटा तुकडा, दोन हिरव्या मिरच्या, चिरलेली/कोथिंबिर, एक चिरलेला कांदा आणि सिमला मिरची, प्रत्येकी एक चमचा जिरेपूड आणि धनेपूड, एक चमचा कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा आमचूर, चाट मसाला, ५० ग्रॅम पनीर, मीठ आणि तेल.

**कृती:** एका भांड्यात पाणी गरम करायला ठेवा. त्यात मूग डाळ घालून उकळून घ्या. डाळीतलं पाणी काढून टाका. आता ही डाळ थंड पाण्याने धुवून बाजूला ठेवा. डाळ थंड झाल्यावर मिक्सरच्या भांड्यात डाळ, आलं, हिरवी मिरची आणि कोथिंबिर घालून वाटून घ्या. हे वाटण एका भांड्यात काढा. आता यात चिरलेला कांदा, सिमला मिरची, जिरेपूड, कॉर्नफ्लोर, आमचूर, चाट मसाला, कुस्करलेलं पनीर आणि मीठ घाला. सर्व घटक नीट



मिसळून घ्या. हाताला थोडं तेल लावा. मूग डाळीचं मिश्रण घ्या. त्याला टिक्कीप्रमाणे गोल आकार द्या. अशाप्रकारे सर्व टिक्की बनवून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. गरम झाल्यावर तव्यावर टिक्की ठेवा. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. ही टिक्की सॉस किंवा चटणीसोबत खाता येईल.

# मीडिया क्षेत्रातून उद्योजगतात

अचिव्हर

यश एका रात्रीत मिळत नाही. त्यासाठी अनेक वर्षांची मेहनत, योग्य दृष्टी आणि प्रचंड संयम लागतो. ही गोष्ट योगेश शर्मा यांच्या आयुष्यावर अगदी तंतोतंत लागू पडते. २००७ साली मुंबईत फक्त ६५०० रुपयांच्या मासिक पगारावर करिअरची सुरुवात करणारे योगेश शर्मा आज ८० कोटी रुपयांहून अधिक उलाढाल असलेल्या प्रीमियम डायनिंग चेनचे मालक आहेत. मीडिया क्षेत्रातून करिअर सुरू केलेल्या योगेश यांनी जवळपास दोन दशकांमध्ये व्यवसाय क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

योगेश शर्मा यांच्या मनातला उद्योजक खूप आधीपासून तयार होत होता. मीडिया क्षेत्रात नोकरी करत असतानाच त्यांनी २०१० मध्ये मुंबईत २० सीट्सचं छोटंसं कॅफे सुरू केलं. यासाठी त्यांनी वडिलांकडून १० लाख रुपयांची गुंतवणूक घेतली होती. कॅफे सुरू असूनही त्यांनी नोकरी सोडली नाही. त्यानंतर ते दिल्लीला परतले आणि रेस्टॉरंट व्यवसाय वाढवण्यावर लक्ष केंद्रित केलं. २०११ मध्ये योगेश यांनी दिल्लीत ७० सीट्सचं रेस्टॉरंट सुरू केलं. त्यानंतर लक्ष्मी नगरमधील एका मॉलसह आणखी दोन मॉल्समध्ये आउटलेट्स सुरू केली. त्यांची ही तीनही रेस्टॉरंट्स खूप यशस्वी ठरली. त्यातून त्यांना दरमहा २० लाख, ४० लाख आणि ६० लाख रुपयांचं उत्पन्न मिळू लागलं. तरुणांमध्ये लोकप्रिय झालेला हा व्यवसाय त्यांनी २०१५ मध्ये विकला आणि पूर्ण लक्ष फॅमिली रेस्टॉरंट आणि नवीन विस्तारावर केंद्रित केलं.



योगेश शर्मा यांच्या आयुष्यातला सर्वात मोठा टर्निंग पॉइंट २०२१ मध्ये आला. त्या वेळी त्यांनी प्रसिद्ध शेफ हरपाल सिंह सोखी यांच्यासोबत मिळून 'कारिगरी व्हेंचर्स' या ब्रँडची स्थापना केली. या ब्रँडची सुरुवात ३ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून झाली. सध्या योगेश शर्मा कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आहेत, तर त्यांचे भाऊ मनीष शर्मा 'सीओओ' म्हणून काम पाहतात. नोएडा मुख्यालय असलेल्या या प्रीमियम ब्रँडचे आज दिल्ली, नोएडा, गुरुग्राम, फरिदाबाद, डेहराडून, बेंगळुरू, इंदूर आणि छत्तीसगडमध्ये मिळून १२ आउटलेट्स आहेत.

हा पूर्णपणे शेफ-आधारित रेस्टॉरंट ब्रँड आहे. येथील वातावरण आणि वेगळा मेनू ही त्याची खास ओळख आहे. साध्या सुरुवातीतून कोट्यवधींचा व्यवसाय उभा करणारे योगेश शर्मा नव्या उद्योजकांना एक महत्त्वाचा सल्ला देतात. ज्या कामाची खरी आवड आहे, तेच काम करा. व्यवसायातील आकडेवारीवर लक्ष ठेवा आणि पूर्ण क्षमतेने मेहनत करा. सर्वात महत्त्वाचं म्हणजे संयम ठेवा, कारण यशाला कोणताही शॉर्टकट नसतो, असे ते सांगतात.




## शेर की जुबानी

सोच रखी है बहुतसी बातें,
तुम्हें मनाने के लिए,
पर तुम आते ही नहीं,
हम से बात करने के लिए।


कितनी छोटी सी
दुनिया है मेरी,
एक मैं हूं और एक,
सच्ची दोस्ती तेरी।

हम रास्तों से
दोस्ती कर लेते हैं,
मंजिल तर पहुंचना
आसान हो जाता है।

# वेगन होताना...

फिटनेस फंडा

जगभरातच सध्या 'वेगन डाएट'चा ट्रेंड आहे. 'वेगन' होणं म्हणजे प्राणीजन्य पदार्थ आहारातून पूर्णपणे वर्ज्य करणं. यात फक्त मांसाहारचं नाही तर दूध आणि दुग्धजन्य पदार्थही आहारातून वगळले जातात. दुग्धजन्य पदार्थांमध्ये भरपूर पोषणमूल्यं असल्यामुळे अचानक वेगन होणं सोपं नसतं. वेगन पदार्थ सगळीकडे उपलब्ध नसतात. त्यातच शरीराला आवश्यक असणारी पोषणमूल्यं इतर माध्यमातून मिळवणं गरजेचं असतं. वेगन डाएट फॉलो करताना त्याचं नीट नियोजन करायला हवं. वेगन होताना काय करायला हवं याविषयी...



* अचानक वेगन होता येत नाही. शाकाहारी असाल तर पहिल्यांदा पनीर किंवा दूध बंद करा. काही दिवसांनी तूप, लोणी बंद करा. अशा पद्धतीने हळूहळू पुढे जा.
* वेगन होताना किंवा कोणतीही आहारपद्धती स्वीकारताना आपण काय खाऊ शकत नाही याचा अधिक विचार केला जातो. त्याऐवजी काय खाऊ शकतो हे ठरवा. पोषक वनस्पतीजन्य पदार्थांचा शोध घ्या. फळं, भाज्या, राजमा, भात, चिया सीड्स, जवस असे अनेक पर्याय सापडतील.
* सकाळी उठल्यावर चहा-कॉफी पिण्याची सवय असेल तर दुधाला पर्यायी घटक शोधा. आल्मंड मिल्क, नारळाचं दूध, सोया मिल्क हे पर्याय तुम्ही ट्राय करू शकता.
* 'बी १२' हे अत्यंत महत्त्वाचं जीवनसत्त्व आहे. 'बी १२' जीवनसत्त्व प्राणीजन्य पदार्थांमध्ये आढळतं. वेगन होताना 'बी १२' युक्त पदार्थांचा शोध घ्या.



# आर्किटेक्ट व्हायचंय?

वेगळ्या वाटा

सध्या स्मार्ट सिटीज आणि ग्रीन बिल्डिंगचा जमाना आहे. आर्किटेक्ट्सना बऱ्याच नव्या संधी उपलब्ध होत आहेत. या करिअरविषयी...

* आर्किटेक्ट बनण्यासाठी विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायला हवा. बारावीनंतर 'नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर'(नाटा) ही परीक्षा द्यावी लागते. यानंतर सरकारी किंवा खाजगी संस्थेत प्रवेश घेता येतो. आर्किटेक्चरचा अभ्यासक्रम पाच वर्षांचा असतो.
* 'नाटा'शिवाय 'जेईई मेन' आणि 'जेईई ॲडव्हान्स' या परीक्षा देऊन एनआयटी आणि आयआयटीमधल्या आर्किटेक्चर अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता.
* आर्किटेक्चरमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन करण्यासाठी 'गेट' परीक्षा द्यावी लागते. यानंतर 'मास्टर्स ऑफ आर्किटेक्चर'ला प्रवेश घेता येतो.
* एग्जिबिशन डिझायनर्स, इंटिरिअर आर्किटेक्ट्स, लँडस्केप आर्टिटेक्ट्स /डिझायनर्स, आर्किटेक्चरल इंजिनिअर्स, प्लॅनर्स म्हणूनही तुम्ही काम करू शकता.

## टेक्नो टॉक

### क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर मिळेल इंटरनेट



आता क्यूआर कोड स्कॅन केल्यावर लगेच इंटरनेट मिळेल. सरकारने 'पीएम-वाणी' योजनेची नवी रूपरेषा तयार केली आहे. यामुळे लोकांना रेल्वे स्टेशन, बस स्टॉप आणि इतर सार्वजनिक ठिकाणी सोप्या आणि सुरक्षित पद्धतीने वायफाय वापरता येणार आहे. यापूर्वी पीएम वाणी वायफाय जोडण्यासाठी लांबलचक पासवर्ड आणि लॉगिन प्रक्रिया करावी लागायची. आता ती पूर्णपणे बदलली आहे. नव्या प्रणालीत तुम्हाला फक्त स्मार्टफोनने स्क्रीनवर दिसणारा क्यूआर कोड स्कॅन करायचा आहे. काही सेकंदांमध्येच इंटरनेट सुरू होईल. लॅपटॉप, टॅब्लेट किंवा इतर कोणत्याही उपकरणासाठीही ही प्रक्रिया खूप सोपी झाली आहे. यामुळे वेळ वाचेल आणि वापरकर्त्यांचा अनुभव खूप चांगला होईल.

लोकांच्या छोट्या-छोट्या गरजा लक्षात घेऊन सरकारने नवे कमी मुदतीचे प्लॅन सुरू केले आहेत. आता तुम्हाला फक्त १५ मिनिटे, ३० मिनिटे किंवा ६० मिनिटांसाठी वायफाय घेता येईल. रेल्वे स्टेशनवर थोडा वेळ थांबलात, बसची वाट बघताय किंवा तातडीने काही माहिती हवी असेल तर हे प्लॅन खूप उपयुक्त ठरतील. कमी पैशात गरजेनुसार डेटा वापरण्याची सोय झाली आहे. सध्या सार्वजनिक ठिकाणी बनावट वायफाय नेटवर्कमुळे अनेकांना फसवणूक होत होती. यावर आता सरकारने कडक पावले उचलली आहेत. सर्व अधिकृत पीएम वाणी नेटवर्कसमोर पीएम वाणी ब्रँडिंग अनिवार्य करण्यात आले आहे. यामुळे लोकांना खरे नेटवर्क आणि बनावट नेटवर्क सहज ओळखता येईल. डेटा चोरी आणि सायबर फसवणुकीचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होईल.

पीएम वाणी योजना ग्रामीण आणि शहरी भागातल्या लोकांना परवडणारे इंटरनेट उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आली होती. आता नव्या बदलांमुळे हा प्लॅन जास्त फास्ट, सुरक्षित आणि वापरायला सोपा झाला आहे.

## ॲप वर्ल्ड

### 'मेटा'ची सेवा आता पेड!




जगातील सर्वात मोठी सोशल मीडिया कंपनी 'मेटा'ने एक मोठी घोषणा केली असून त्याचा थेट परिणाम 'सोशल मीडिया' आणि मेसेजिंग ॲप्स वापरणाऱ्या यूजर्सवर होणार आहे. कंपनीने आता इन्स्टाग्राम, फेसबुक आणि व्हॉट्सअॅपसाठी नवीन 'पेड सबस्क्रिप्शन प्लॅन्स' सादर केले आहे. विशेष म्हणजे हे प्लॅन्स भारतासह जगभरातील यूजर्ससाठी लागू करण्यात येणार आहेत.

'मेटा' आता आपल्या ॲप्सचे 'प्लस' व्हर्जन आणत आहे. यात प्रीमियम प्लॅनमध्ये पैसे भरून सब्स्क्रिप्शन घेणाऱ्या यूजर्सना एक्सक्लुझिव्ह टूल्स, कस्टमायझेशन फीचर्स आणि अधिक चांगला अनुभव मिळणार आहे. हे फीचर्स मोफत वापरकर्त्यांना उपलब्ध नसतील. कंपनीचा हा निर्णय केवळ जाहिरातींवर आधारित कमाईवर अवलंबून न राहण्याच्या रणनीतीचा भाग मानला जात आहे. आतापर्यंत 'मेटा' ची मोठी कमाई जाहिरातींमधून होत होती; मात्र आता कंपनी प्रीमियम सबस्क्रिप्शनद्वारे नवीन कमाईचे मॉडेल तयार करणार आहे. 'मेटा'च्या मते, अनेक यूजर्स अधिक सुरक्षित, प्रीमियम सुविधेसाठी पैसे देण्यास तयार आहेत. त्यामुळे कंपनीने खास फीचर्ससह 'पेड प्लॅन्स'ची घोषणा केली आहे.

'इन्स्ट्राग्राम प्लस' आणि 'फेसबुक प्लस'साठी दरमहा ३.९९ डॉलर म्हणजेच अंदाजे ३८७ रुपये शुल्क ठेवण्यात आले आहे. तर 'व्हॉट्सअॅप प्लस'साठी दरमहा २.९९ डॉलर म्हणजेच सुमारे २९० रुपये मोजावे लागतील; मात्र भारतात किती किंमत असेल हे कंपनीने अजून अधिकृतपणे जाहीर केले नाही.

व्हॉट्सअॅप प्लस प्लॅनमध्ये यूजर्सना कस्टम थीम, वेगळे रिंगटोन्स, प्रीमियम स्टिकर्स आणि अधिक चॅट्स पिन करण्याचा पर्याय दिला जाईल. तर इन्स्टामग्राम प्लसवर यूजर्सना त्यांच्या स्टोरी किती वेळा पुन्हा पाहिली गेली हे पाहता येणार आहे. तसेच व्ह्यूअर्स लिस्टमध्ये नाव न दाखवता स्टोरी प्रिव्ह्यू पाहता येणार आहे.

# बॅग वापरण्याची 'स्मार्ट' पद्धत

स्मार्ट टिप्स

आजकाल ऑफिस, कॉलेज किंवा प्रवासाला जाताना बॅग घेणं गरजेचं झालं आहे; पण रोज बॅग वापरल्यामुळे आवडते शर्ट लवकर खराब होतात. विशेषत: खांद्याजवळचा कपडा घासला जाणं, सुरकुत्या पडणं किंवा रंग फिका होणं, या खूप सामान्य समस्या आहेत. अनेकांना वाटतं की कपड्याची क्वालिटी खराब आहे; पण खरं कारण बहुतेक वेळा बॅग वापरण्याची पद्धत असते. चांगली गोष्ट म्हणजे एक छोटा बदल केल्याने शर्ट जास्त दिवस चांगला राहू शकतो.

आपण रोज एकाच खांद्यावर बॅग घेतो, तेव्हा तिचा पट्टा सतत कपड्याला घासतो. या घर्षणामुळे शर्टचं कापड हळूहळू कमकुवत होतं. कॉटन आणि लिननसारख्या कापडांच्या शर्ट्सवर याचा जास्त परिणाम होतो. त्यात घाम आणि धूळही पट्ट्यामुळे कपड्यावर साचत राहते. त्यामुळे खांद्याजवळचा भाग फिका दिसू लागतो. सगळ्यात सोपा आणि उपयोगी उपाय म्हणजे बॅकपॅक वापरत असाल, तर दोन्ही पट्टे वापरा. त्यामुळे वजन दोन्ही खांद्यांवर समान वाटतं आणि एका बाजूवर जास्त ताण येत नाही. यामुळे शर्ट सुरक्षित राहतो आणि शरीराची ठेवणही चांगली राहते. लॅपटॉप बॅग किंवा स्लिंग बॅग वापरत असाल तर मध्ये मध्ये खांदा बदलत राहा. सगळ्या बॅग्स शर्टसाठी चांगल्या नसतात.



काही बॅगचे पट्टे खूप कडक किंवा खरखरीत असतात. त्यामुळे कपडे लवकर खराब होतात.

**बॅग घेताना या गोष्टी लक्षात ठेवा:**

* मऊ आणि पॅडिंग असलेले पट्टे असलेली बॅग घ्या
* खूप जड बॅग रोज वापरू नका
* पट्ट्याखाली रबर किंवा हार्ड प्लास्टिक असलेले डिझाइन टाळा
* हलक्या वजनाच्या बॅग्स जास्त चांगल्या असतात

अनेक जण नवीन फॉर्मल शर्ट घालून जड लॅपटॉप बॅग घेतात. त्यामुळे शर्ट लवकर सैल आणि बिनआकाराचे दिसू लागतात. तुम्ही ऑफिसमध्ये जास्त फॉर्मल कपडे वापरत असाल, तर बॅकपॅकऐवजी हलकी हँडबॅग किंवा ब्रीफकेस वापरणं चांगला पर्याय ठरू शकतो.

स्टायलिश दिसणं फक्त महागडे कपडे घालण्यावर अवलंबून नसतं, तर त्यांची नीट काळजी घेणंही तितकंच महत्त्वाचं असतं. रोज बॅग वापरत असाल, तर थोडी काळजी घेतल्याने तुमच्या शर्टचा फिट, रंग आणि गुणवत्ता जास्त काळ टिकू शकते.

# उच्च ध्यासाला हवे प्राधान्य

मोटिव्हेशन

सचिन तेंडुलकरने एका मुलाखतीत आयुष्यात कमावलेल्या अनन्यसाधारण यशाचे काही महत्त्वाचे घटक सांगितले. त्यामध्ये सर्वाधिक प्राधान्यक्रम उच्च ध्यासाला असल्याचे सांगितले. ध्येयपूर्तीसाठी किती कष्ट व मेहनत घेत आहात, आपल्या चुकांमध्ये सुधारणा करून प्रगती करण्याची तयारी किती आहे, हे महत्त्वाचे आहे. ध्यासामुळे कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकता. पाल्यामध्ये ध्यास निर्माण होण्यासाठी पालकांचे सहकार्य, प्रोत्साहन महत्त्वाचे ठरते. माणसाने उच्च कोटीचा ध्यास घेऊन कायम योग्य दिशेने वाटचाल केली, तर यश मिळण्याची शक्यता खूपच जास्त असते. कॉर्पोरेट, क्रीडा क्षेत्रात ध्यास घेऊन यशस्वी झालेली अनेक उदाहरणे आहेत.



शून्यातून व्यवसाय सुरू करून प्रचंड कष्ट करून व उच्चस्तरीय ध्यास घेऊन लोकांनी फार मोठे नाव कमवले आहे. क्रीडा क्षेत्रात ध्यास घेऊन करिअर मोठे केलेली अनेक उदाहरणे आहेत. टेनिसमध्ये, लिएंडर पेस, महेश भूपती, रोहन बोपण्णा तर बॅडमिंटनमध्ये पी व्ही सिंधू, सायना नेहवाल, प्रकाश पदुकोण, गोपीचंद, तसेच सध्याचे दोन मोठे प्लेयर्स आयुष शेट्टी व लक्ष्य सेन हे सर्व खेळाडू त्यांच्या उच्च ध्यासाच्या जोरावर आंतरराष्ट्रीय स्तरावर फार मोठे यश मिळवत आहेत. उच्च कोटीचे ध्येय मुलांमध्ये योग्य संस्कारांनी जोपासणे हे पालकांचे सर्वात मोठे काम आहे. योग्य वयात पालकांनी ध्येय या संज्ञेचा खऱ्या अर्थाने मुलांना महत्त्व समजून सांगितले पाहिजे. त्यांना अनेक उदाहरणे देऊन मुलांमध्ये ध्यास निर्माण केला पाहिजे. त्यासाठी घरी योग्य वातावरण आणि पालक-मुलांमध्ये पारदर्शक चर्चा होणे आवश्यक आहे. सध्याच्या अति जलद आयुष्यात पालक आणि पाल्य यांच्यातील संवाद खूप कमी झाला आहे, त्यामुळे अशा गोष्टी पालक त्यांच्या मुलांपर्यंत पोहोचवू शकत नाहीत, हे दुर्दैव आहे.

# कलाकारांसाठी संधी, की आव्हान?


एआय वर्ल्ड

आज 'सोशल मीडिया', जाहिरात आणि डिझाइन क्षेत्रात 'मिडजर्नी' प्रचंड लोकप्रिय होत आहे. कारण हे टूल कल्पनांना चित्ररूप देण्याचे काम करते. 'मिडजर्नी' हे 'एआय'वर आधारित 'इमेज जनरेशन टूल' आहे. एका बाजूला नवीन कल्पना पटकन तयार होतात, वेळ वाचतो, प्रयोग करणे सोपे जाते, छोटे क्रिएटर्सही मोठ्या दर्जाचे डिझाइन तयार करू शकतात, तर दुसऱ्या बाजूला मानवी कला मागे पडेल का, 'कॉपीराइट'चे प्रश्न निर्माण होतील का, असे प्रश्न तयार होतात. 'एआय'ने तयार केलेली कला कोणाची, अशा चर्चाही सुरू आहेत. कंपन्या आता मार्केटिंग आणि जाहिरातींसाठी 'एआय इमेज टूल्स' वापरत आहेत. कारण वेळ कमी लागतो, खर्च कमी होतो, अनेक पर्याय पटकन मिळतात, कल्पनांचे व्हिज्युअलायझेशन सोपे होते. इथे चित्र काढण्यापेक्षा 'योग्य वर्णन लिहिणे' महत्त्वाचे असते. यालाच 'प्रॉम्प्ट इंजिनीअरिंग' म्हणतात. म्हणजेच भविष्यात 'कल्पना स्पष्ट मांडण्याची कला' अधिक महत्त्वाची ठरणार आहे. 'एआय' चित्रनिर्मिती जितकी प्रभावी आहे तितक्याच काही चिंता देखील वाढत आहेत. खोटी चित्रे तयार होणे, दिशाभूल करणारे फोटो, कॉपीराइट समस्या, वास्तव आणि कृत्रिम चित्रातील फरक ओळखणे कठीण होणे. म्हणूनच एआय वापरताना जबाबदारी खूप महत्त्वाची ठरते.

# स्वच्छ हवेचे हिलस्टेशन

भटकंती

महाबळेश्वरपासून अवघ्या २० किलोमीटर अंतरावर वसलेले पाचगणी हे एक अत्यंत सुंदर आणि शांत हिल स्टेशन आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेले पाचगणी हे पश्चिम घाटातील एक आकर्षक पर्यटनस्थळ मानले जाते. हिरव्यागार दऱ्या, डोंगररांगा आणि स्वच्छ हवा यामुळे येथे आलेल्या पर्यटकांना वेगळाच अनुभव मिळतो. शहराच्या गजबजाटापासून दूर, शांतता आणि निसर्गाचा आनंद घेण्यासाठी हे ठिकाण उत्तम आहे. पाचगणी हे समुद्रसपाटीपासून सुमारे १३०५ मीटर उंचीवर वसलेले आहे. वर्षभर येथील हवामान आल्हाददायक असते. त्यामुळे उन्हाळ्यातही येथे



थंडावा अनुभवायला मिळतो. त्यामुळेच पर्यटकांसाठी हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र ठरते. महाबळेश्वर हे लोकप्रिय हिल स्टेशन पाचगणीच्या अगदी जवळ आहे; मात्र महाबळेश्वरच्या तुलनेत पाचगणी अधिक शांत आणि कमी गर्दीचे ठिकाण आहे. त्यामुळे निवांत वेळ घालवण्यासाठी हे अधिक योग्य मानले जाते.

अनेक पर्यटक खंडाळा किंवा माथेरान या ठिकाणी जातात; मात्र पाचगणी हे तितकेच सुंदर असूनही कमी गर्दीमुळे अधिक शांत अनुभव देते. पाचगणी हे कुटुंबासोबत फिरण्यासाठी उत्तम ठिकाण आहे.

# पारंपरिक आणि फ्यूजनवर लक्ष

फॅशन पॅशन

सणांचा हंगाम येताच स्वतःला अशा प्रकारे सजवावे की लोक त्याची दखल घेतील, असे प्रत्येकाच्या मनात येते. नवरात्रोत्सव सुरू होताच, तरुणांमध्ये नवीन फॅशनची क्रेझ दिसून येते. त्याच वेळी, बाजारपेठ त्यांना एक नवीन लूक आणि स्टाइल देण्यासाठीदेखील सज्ज होते. आजकाल ब्रीचची क्रेझ आहे. म्हणूनच सध्या मुलांचे लक्ष पारंपारिक आणि फ्यूजनवर आहे.

सणांचा हंगाम लक्षात घेऊन, हलके आणि चमकदार रंगांना महत्त्व दिले जात आहे. त्याच वेळी तरुण भारतीय आणि पाश्चात्य पोशाखांच्या संयोजनांची मागणी करत आहेत. कॉटन सिल्क, प्युअर सिल्क आणि मटका सिल्क कापडांचा वापर केला जात आहे. समकालीन फॅशन पोशाखांमध्ये नवीन प्रयोग केले जात आहेत.



**ब्रीचची विशेष मागणी**

राजस्थानची खास ओळख असलेल्या ब्रीच (रायडर्स पॅन्ट) आता अनेक शहरांमध्ये नवीन प्रयोगांसह सादर केले जात आहेत. सणासुदीच्या काळात त्याला विशेष मागणी असते. याशिवाय कुर्ता धोती, हाफ जॅकेटसह कुर्ता चुडीदार, ब्रीचसह शॉर्ट कुर्ता, काउल पँटसह अंगरखा (धोतीची नवीन आवृत्ती) यांनाही विशेष पसंती दिली जात आहे. आजकाल तरुणांना समकालीन फॅशन पोशाखांमध्ये नवीन व्हेरिएशन पहायचे आहे. म्हणून नवीन प्रयोगांसह सादरीकरणावर लक्ष केंद्रित केले जात आहे. सणासुदीच्या काळात पुरुषांना फॅशनमध्ये पिवळा, नारंगी, फिरोजा हिरवा आणि निळा असे रंग आवडतात.

रंग आणि कापडांचा विचार केला तर फॅशन पूर्वीसारखीच आहे. परंतु उत्सवाच्या हंगामात कुर्ता, अंगारखा, शॉर्टकुर्ता यासारख्या पोशाखांसह ती वापरली जात आहे. उदाहरणार्थ, पूर्वी शर्टमध्ये प्रिंट शर्टची फॅशन चालू होती. आता सणाप्रमाणे कुर्त्यासारख्या पोशाखांमध्ये त्याची मागणी वाढली आहे. आजकाल पुरुषांच्या फॅशनमध्ये प्रिंटिंग कुर्ता ट्रेंड करत आहेत.

# आनंदऋषी हॉस्पिटलच्या दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिरात ११० रुग्णांची तपासणी

नगर – राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषी महाराज यांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिराचे आयोजन धनलक्ष्मी ट्रेडिंग कंपनी (अहिल्यानगर/नाशिक) व भंडारी परीवाराच्या वतीने करण्यात आले होते. या शिबिरात ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन उद्योजक अशोक भंडारी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. या याप्रसंगी सविता भंडारी, पराग भंडारी, निकीता भंडारी, उद्योजक राजेश भंडारी, नयना भंडारी, सी.ए सोहन गुगळे, प्रेषिका भंडारी, मानविक भंडारी आदींसह जैन सोशल फेडरेशनचे डॉ. वसंत कटारीया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ. भास्कर जाधव, डॉ. रविंद्र मुथा, डॉ. महेश घुगे आदी उपस्थित होते.



आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे उद्घाटन करताना उद्योजक अशोक भंडारी, सविता भंडारी, पराग भंडारी, निकीता भंडारी, राजेश भंडारी, नयना भंडारी, सी.ए सोहन गुगळे, प्रेषिका भंडारी आदी.

यावेळी बोलताना उद्योजक अशोक भंडारी म्हणाले, आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी महाराज यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे.या मोफत आरोग्य शिबिरात भंडारी परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स नर्सेस व कर्मचारी निस्वार्थ भावनेने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर आहे, असे ते म्हणाले.

निकिता भंडारी म्हणाल्या, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे शिबिराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात सेवा कार्य सुरू आहे. जैन सोशल फेडरेशनने या शिबिरात सहभागी होण्याची संधी भंडारी परिवाराला दिल्याबद्दल शतशःऋणी आहे. भविष्यात ही सेवा करण्याची संधी भंडारी परिवाराला द्यावी.

उद्योजक राजेश भंडारी म्हणाले, धावपळीच्या युगामध्ये प्रत्येकाला वेगवेगळ्या आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून विविध आजारांवर उपचार व शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या जात आहेत.दररोज पाचशे ते हजार रुग्ण या आरोग्य सेवेचा लाभ घेत आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब जनतेची व समाजाची सेवा घडत आहे.या आरोग्य सेवेच्या महान कार्यात जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य मोठे योगदान देत आहे. समाजाला भूषणावह असे कार्य करीत आहे. वर्धमान महावीर स्कूल व आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. ही कौतुकास्पद बाब आहे.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारीया म्हणाले, समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवेचे कार्य पोहोचले पाहिजे ही भावना व उद्देश डोळ्यासमोर ठेवून हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य अविरतपणे सुरू आहे. अशोक भंडारी व भंडारी परिवार धार्मिक असून सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. भंडारी परिवाराने आयोजित केलेल्या शिबिरामुळे मोठ्या प्रमाणात रुग्णसेवा होत आहे.सामान्य रुग्णांना गुणवत्तापूर्वक व सवलतीच्या दरात आरोग्य सेवा मिळावी.यासाठी हॉस्पिटलच्या वतीने वर्षभर विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन केले जात आहे. या शिबिरांचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.

डॉ. महेश घुगे म्हणाले, हॉस्पिटलमध्ये दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया अत्याधुनिक पद्धतीने व यशस्वीपणे केले जात आहेत. तसेच आतडे, फुफ्फुसे व कॅन्सर या सारख्या आजारांवरील शस्त्रक्रिया दुर्बीणद्वारे केल्या जात आहेत. या शिबिराचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा.

सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.



## गुरुवाणी – १६
## वैरभावाची 'निर्जरा' करा

आयुष्यात बंध तत्व माहिती असणे आवश्यक आहे. कर्म असे बांधा की जगातील पाप नष्ट होईल. आचार्यांच्या आधी १००८ लिहितात कारण त्यांच्यात तीर्थंकरांची छबी असते. निर्जरा म्हणजे अनावश्यक गोष्टी काढून टाकायच्या. आश्रव, संवर, बंध आणि निर्जरा या चार तत्वावर जीवन चालते. समर्थ व्यक्ती ही चार तत्व स्वतःसाठी आणि दुसऱ्यासाठीही करतात. गुरूदेवांमध्ये हे सामर्थ्य होते. दुसऱ्याचे पाप समाप्त करणारे तीर्थंकरांचे वंशज असतात. दुसऱ्याचे पाप वाढवतात ते रावणाचे वंशज असतात. सन १९७४ मध्ये मुंबईत चातुर्मास सुरू होता. एकाला घश्याचा कॅन्सर झाला होता. ती व्यक्ती सपरिवार गुरूदेवांकडे आली. गुरूदेवांनी त्याच्या गळ्यावरून हात फिरवला, गाठ गायब झाली. तीर्थंकरांच्या समवशरणमध्ये वाघ आणि बकरी एकमेकांशेजारी बसायचे. बकरीला वाघाचे भय नव्हते व वाघाला खायची इच्छा नसायची. तीर्थंकरांमुळे वैरभावाची निर्जरा होते. कचरा साफ करताना दुसऱ्याच्या घरातीलही कचरा साफ केला पाहिजे, हे जैनिझम आहे. श्रमण संघ करण्याची तयारी चालू होती. उदयपूर येथे सर्व संप्रदाय होते. तिथे संप्रदायांना एकसंघ करणाऱ्या संताचा चातुर्मास करण्याचे ठरवण्यात आले. तेव्हा एकमताने गुरूदेवांचा चातुर्मास करण्याचा निर्णय झाला. काही लोकं यात आडकाठी आणण्यासाठी प्रयत्न करू लागले. षड्यंत्र रचू लागले. त्यांनी गुरूदेव बाहेर गेले असताना त्यांच्या सर्व सामानाची तपासणी सुरू केली. त्यांना काहीच आक्षेपार्ह मिळाले नाही. गुरूदेवांच्या परत येण्याची वेळ झाली. विस्कटलेले सामान पटापट आवरून ते पळून गेले. पण गुरूदेवांचे सामान अतिशय व्यवस्थित लावलेले असायचे. त्यांना लगेच कळले की उचकापाचक झाली आहे. हे कृत्य करणारे घाबरले होते. पण गुरूदेवांनी कुठेच याची वाच्यता केली नाही. अखेर ती लोकं गुरूदेवांच्या चरणी नतमस्तक होऊन माफी मागू लागले. गुरूदेव म्हणाले, 'तुम्ही माझे सामान पाहिले यात चुकीचे काहीच नाही. कारण माझे जे काही आहे ते समाजाचेच आहे. फक्त तुम्ही सांगून तपासले असतं तर शांतपणे पाहू शकले असता'. इकडे आपल्याकडे घरातील कोणाचा फोन कोणी तपासला तर राग येतो. मुलांच्या फोनला लॉक असतं. पण गुरूदेव निर्जरा करायचे. ते दुसऱ्यांची चूक सुधारायचे. चूक करणाऱ्याचा द्वेष नाही करायचे. त्यांनी सकल संघाला जोडण्याचे काम केले. म्हणूनच ते प्रधान आचार्य बनले.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# पाकिस्तान, फिलिस्तीन कनेक्शनची सीबीआय चौकशी करण्याची मागणी

## किरण काळे यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन

नगर – धर्म कार्य करणाऱ्या स्व. धीरजसिंह परदेशीचा मृत्यू दुर्दैवी आहे. त्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून तातडीने ५० लाखांची मदत, कुटुंबातील सदस्याला अहिल्यानगर मनपात सरकारने नोकरी द्यावी, अशी आमची मुख्यमंत्र्यांकडे मागणी आहे. याप्रकरणी वक्तव्य करताना गुन्ह्यातील आरोपींचे पाकिस्तान, फिलिस्तीनशी कनेक्शन असल्याची माहिती सत्ताधारी नेत्यांनी दिली आहे. हा राष्ट्रीय सुरक्षेचा गंभीर प्रश्न आहे. या कनेक्शनची केंद्रीय गृह विभागाकडून सीबीआयमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अहिल्यानगर महानगर प्रमुख किरण काळे यांनी केली आहे.

याबाबत तपास करून केंद्रीय गृह खात्याला सीबीआय चौकशी करिता अहवाल पाठवण्याची मागणी ठाकरे शिवसेनेने जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. काळे म्हणाले, स्व. धीरज हा धर्माभिमानी होता. कट्टर हिंदुत्ववादी होता. त्याच्या हत्येच्या प्रकरणातील हल्लेखोरांना रसद पुरवली गेली, आरोपींचे फिलिस्तीन, पाकिस्तान पर्यंत कनेक्शन असल्याची माहिती एसपी ऑफिस चौक सभेत भाजपचे संग्राम भंडारे यांनी दिली. आ. संग्राम जगताप यांनी निष्पन्न होणारे आरोपी फिलिस्तीनचं समर्थन करणारे असल्याचं म्हटलं आहे. काही लोकांकडून भारत विरोधी घोषणा दिल्या जातात असा आ. गोपीचंद पडळकर यांचा आरोप आहे. सत्तेतल्याच लोकप्रतिनिधींची ही माहिती जर खरी असेल तर हा पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नाकर्तेपणा आहे. सरकारने या तिघांच्याही वक्तव्यांची गंभीर दखल घ्यावी. शहरा लगत लष्कराचा मोठा तळ आहे. संवेदनशील भाग आहे. या तिघांनी देशाला दिलेली ही गंभीर माहिती त्यांना कोणी दिली?, हे कनेक्शन काय आहे?, फिलिस्तीन, पाकिस्तान मधून कोणी दहशतवादी आरोपींना रसद पुरवत आहेत का?, त्यांचे अन्य कोणी साथीदार अहिल्यानगर मध्ये दडून बसले आहेत का?, यात काही आंतरराष्ट्रीय संशयास्पद आर्थिक ट्रांजेक्शन झालेत का? याबाबत भाजपच्या तिन्ही नेत्यांना जी काही माहिती आहे ती रेकॉर्डवर घेत तपास यंत्रणांनी तिघांची न्यायालयासमोर शपथपत्राद्वारे साक्ष नोंदवावी. पुरावे संकलित करावेत. सहभागींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून जलदगती न्यायालयात स्वतंत्र खटला चालवावा, अशी मागणी किरण काळे यांनी केली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयटक-सीटूची निदर्शने
## शासनाच्या कामगारविरोधी धोरणांविरोधात घोषणाबाजी

नगर – केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा निषेध आणि विविध क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस (आयटक) व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीआयटीयू/सीटू) यांच्या संयुक्त विद्यमाने १० ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार निदर्शने करण्यात आली. आंदोलकांनी विविध मागण्यांच्या समर्थनार्थ व कामगारविरोधी धोरणांविरोधात घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करताना सीटू कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी, कामगार.

या आंदोलनात आयटकशी संलग्न अहिल्यानगर महानगरपालिकेतील आशा वर्कर, मोहटादेवी देवस्थान, मढी देवस्थान तसेच अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सीआयटीयूचे पदाधिकारी व कार्यकर्तेही आंदोलनात सहभागी झाले होते. आयटकचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा सेक्रेटरी ड. कॉ. सुधीर टोकेकर आणि सीआयटीयूचे प्रवीण सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत आंदोलन झाले. यावेळी कॉ. सतीश पवार, कॉ. मारुती दहिफळे, सचदेव ईश्वर, कॉ. सुभाष शिंदे, कॉ. कन्हैया बुंदेले, कॉ. महादेव पालवे, तसेच आशा संघटनेच्या अहिल्यानगर महानगरपालिका अध्यक्षा स्वाती भनगे, तब्सुम तांबोळी, शितल कापरे, शेख रुकसाना, विजया वाघ, सुंदराबाई वाघ, मोनाली धूपदरे, योगिता थोरात, जयश्री कव्हाणे, शेख अफसाना यांच्यासह अनेक कामगार प्रतिनिधी व महिला कर्मचारी सहभागी झाल्या.

केंद्र सरकारने लागू केलेले चारही नवीन कामगार कायदे रद्द करून जुने कामगार कायदे पूर्ववत लागू करावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच औद्योगिक व कंत्राटी कामगारांना पीएफ व ईएसआयचे कायदेशीर लाभ सक्तीने द्यावेत, अशी मागणीही करण्यात आली. मढी देवस्थान, मोहटादेवी देवस्थान व अवतार मेहेरबाबा ट्रस्टच्या कर्मचाऱ्यांना दरमहा २८ ते ३० हजार रुपये वेतनवाढ द्यावी. आशा कर्मचाऱ्यांना किमान २५ हजार, तर गटप्रवर्तकांना ३० हजार रुपये वेतन लागू करावे. आशा कर्मचाऱ्यांवर आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या कामांव्यतिरिक्त अतिरिक्त कामाचा बोजा लादू नये, अशी मागणी करण्यात आली.

अहिल्यानगर महानगरपालिकेतील आशा कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून प्रत्येकी १० हजार रुपये सानुग्रह अनुदान द्यावे, अशीही मागणी करण्यात आली. विविध कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा व सामाजिक सुरक्षा द्या, शालेय पोषण आहार कर्मचारी, मोलकरीण आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना सरकारी कर्मचाऱ्याचा दर्जा द्यावा. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे किमान वेतन २० हजार रुपये करून त्यांना पेन्शन योजना लागू करावी, अशी मागणी करण्यात आली.

पतसंस्था कर्मचाऱ्यांना सेवा नियम लागू करून पीएफ योजनेत समाविष्ट करावे तसेच दर दुसऱ्या व चौथ्या शनिवारी पतसंस्था बंद ठेवाव्यात, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. यासोबतच सर्व प्रकारच्या शेतमालाला योग्य व हमीभाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली. कामगारांच्या हक्कांवर गदा आणणारे चारही श्रम कायदे तातडीने मागे घेऊन वरील मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आयटक व सीटूच्या वतीने देण्यात आला.



लक्ष्मीआई यात्रेनिमित्त लालटाकी येथे काढण्यात आलेली मिरवणूक.

# लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात

नगर – महालक्ष्मी माता मित्र मंडळाच्या वतीने आषाढी अमावस्यानिमित्त लालटाकी येथे लक्ष्मीआईची यात्रा उत्साहात पार पडली. मंडळाचे अध्यक्ष साहेबराव काते यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या शोभायात्रेत पारंपारिक वाद्यांच्या गजरात पोतराज व भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

साहेबराव काते हे महालक्ष्मीचे भक्त असून, सालाबाद प्रमाणे दरवर्षी ते यात्रा उत्सवाचे आयोजन करुन, शोभायात्रा काढत असतात. या सोहळ्याचे हे २५ वे वर्ष असून. या शोभायात्रेचे प्रारंभ लालटाकी भारस्कर कॉलनी येथून झाले. पारंपारिक वाद्यांचे गजर व लक्षीमातेच्या जयघोषाने परिसर दणाणून निघाला. सर्जेपुरा, दिल्लीगेट, न्यु आर्टस महाविद्यालय मार्गे लालटाकी येथील लक्ष्मीमाता मंदिरात या शोभायात्रेचा समारोप झाला. शोभायात्रेनंतर भाविकांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. याचा भाविकांसह परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

यावेळी साहेबराव काते, सुशिलाबाई काते, आदिनाथ काते, योसेफ काते, राजू काळुंखे, मच्छिंद्र वैरागर, बहिरुनाथ वैरागर, सागर काते, संदीप त्रिभुवन, दत्तात्रय जाधव, अलंकार भोगले, यश जाधव, अनिता जाधव, आशाबाई मोहिते, सुनिल वैरागर, कार्तिका वाघमारे, भारती कुचेकर, गुनाबाई भोसले, भाग्यश्री मोहिते, संगिता कांबळे, सिताबाई वडागळे आदीसह भाविक उपस्थित होते.

# संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथील मंदिरात पूजन व अभिवादन

नगर – मानवता, समता, विश्वबंधूता या नितीमूल्यांवर आधारित असलेला हा वारकरी संप्रदाय समाजाचा आरसा आहे. कांदा, मुळा भाजी.. अवघी विठाई माझी.. या अभंगाने प्रत्येकच्या मनावर राज्य करणारे संत म्हणजेच सावता माळी होय. जीवनात कर्तव्यकर्मे करीत असतानाच तन-मन-धनाने ईश्र्वरभक्ती करता येते, हा अधिकार सर्वांना आहे. या विचारातून जनसामान्यांना भक्तीचा मार्ग दाखविला. धार्मिक प्रबोधनाचे व भक्ती प्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून आचरिले. समरसता आणि अलिप्तता यातील विलक्षण समतोल त्यांच्या जीवनचरित्रातून दिसून येतो, असे प्रतिपादन संस्थेचे चेअरमन नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले.



संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथील मंदिरात अभिवादन करण्यात आले.

श्री संत सावताश्रम शिक्षण समितीच्यावतीने संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त माळीवाडा येथील मंदिरात अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन नगरसेवक बाळासाहेब बोराटे, सचिव प्रा.सुनिल जाधव, प्राथमिकचे मुख्याध्यपक राजकुमार शिंदे, माध्यमिकचे मुख्याध्यपक राजीव घोलप, कविता शिंदे, संगीता बडे, मीना पगारे, कुंभारे, अनिल शिंदे, रमेश बोरबने आदी उपस्थित होते.

याप्रसंगी सुनिल जाधव म्हणाले, प्राचीन काळापासून या महाराष्ट्राच्या भूमीमध्ये अनेक शूर, वीर, संत मंडळी होऊन गेले. अनेक संतांनी वारकरी संप्रदायाला खरी शोभा मिळवून दिली. संत सावता महाराजांनी अध्यात्म आणि भक्ती, आत्मबोध आणि लोकसंग्रह, कर्तव्य आणि सदाचार याची बेमालूम सांगड घातली. धर्माचरणातील अंध:श्रद्धा, कर्मठपणा यास विरोध करुन केवळ ईश्र्वराचे अंतःकरणपूर्वक चिंतनाने ईश्वर प्रसन्न होतो, असा साधा भक्तीचा मार्ग दाखलविला.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विविध मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांची निदर्शने

नगर – राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या आवाहनानुसार ११ ऑगस्ट रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी एकत्र येत चेतना दिन व मागणी दिन एकजुटीने साजरा केला. विविध मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली.




राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या आवाहनानुसार ११ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनात संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय काकडे, भाऊ शिंदे, सुनील आहेर, सहचिटणीस संदिपान कासार, पुरुषोत्तम आडेप, सागर गायकवाड, मुकुंद शिंदे, मंजुषा बागडे, सी.पी. नोडके, सोनाली वडणे, मनीषा ओहोळ, एस. एम. वैद्य, लता गायकवाड, भाऊसाहेब डमाळे, वासुदेव राक्षे, अमीन इनामदार, विश्वेश्वर खेडेकर, दीपक चन्ने, वृषाली करोसिया, सुरेश जेढे, अमर शिंदे, सौरव बोठे, रेणुका येंबारे आदींसह सरकारी कर्मचारी सहभागी झाले होते.

११ ऑगस्ट १९६६ हा दिन राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या जीवनातील संघर्षाचा आरंभिक टप्पा होता, ज्याच्या स्मृतीस उजाळा देत आजचा हा दिवस कर्मचाऱ्यांच्या हक्कांच्या लढ्यासाठी महत्त्वाचा ठरला. या पार्श्वभूमीवर चेतना दिन व मागणी दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रशासनासमोर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित व न्याय्य मागण्यांचा आग्रह धरण्यात आला.

१ मार्च २०२४ पासून आजपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या व सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेसाठी विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यांना योजना अंमलबजावणीचे अंतिम आदेश येईपर्यंत तात्पुरते निवृत्ती वेतन तात्काळ देण्यात यावी, चतुर्थश्रेणी व वाहन चालक पदांसह सर्व रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावीत, सेवानिवृत्तीची मर्यादा ६० वर्षे करण्यात यावी, सर्व सरकारी कर्मचारी, निवृत्ती वेतनधारक, कंत्राटी व रोजंदारी कामगारांना व्यापक कॅशलेस विमा योजना लागू करावी आणि लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना अपेक्षित वेतन वृद्धीचा लाभ मिळण्यासाठी योग्य उपाययोजना करावी, अशा प्रमुख मागण्यांसाठी हा लढा पुकारण्यात आला आहे. या आंदोलनामध्ये राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी वर्ग उत्साहाने सहभागी झाले होते.

रावसाहेब निमसे यांनी संघटनेच्या एकजुटीने अनेक मागण्यांना यश आल्याचे स्पष्ट केले. सुभाष तळेकर यांनी सरकारी कर्मचारी एकजुटीने त्यांच्या हक्कासाठी संघर्ष करीत असून, या मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे सांगितले.

अशोक मासाळ म्हणाले की, कुठलाही लढा हा केवळ मागण्यांसाठी नसून तो कर्मचाऱ्यांच्या स्वाभिमानाचा आणि हक्काचा प्रश्न असतो. १९६६ च्या संघर्षाची ती ज्वाला आजही आमच्या रक्तात आणि विचारात तेवत आहे; म्हणूनच आज ११ ऑगस्टचा चेतना दिन म्हणजे केवळ एक उपक्रम नाही, तर आमच्या शिस्तीची आणि एकजुटीची ताकद शासनाला दाखवण्याचा हुंकार असल्याचे त्यांनी सांगितले.

